दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२११ | शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

संपादकीय....

राजधानीबाहेरची कूटनीती की उद्योगपतींच्या हितांना प्राधान्य?

जागतिक राजकारणात आता केवळ राष्ट्रप्रमुखांच्या भेटी, राजधानीतील भव्य स्वागतसमारंभ आणि औपचारिक बैठका यावरून राजनैतिक संबंधांचे मूल्यमापन करता येत नाही. ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळी यामधील हितसंबंध जागतिक मुत्सद्देगिरीची दिशा ठरवत आहेत. भू-राजकारणाबरोबरच भू-अर्थकारणाचे महत्त्व वाढत असताना अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांच्या ऑक्टोबरमधील भारत दौऱ्याने नव्या प्रश्नांना जन्म दिला आहे. मुंबईतील उच्चस्तरीय चर्चा आणि गुजरातमधील जामनगर येथील रिलायन्सच्या तेलशुद्धीकरण प्रकल्पाला दिलेली भेट यामुळे या दौऱ्याच्या आर्थिक आणि राजनैतिक उद्दिष्टांची चर्चा स्वाभाविक आहे.

थोडक्यात...

सौदीतील हल्ल्यातील मृतांमध्ये भारतीयाचा समावेश

दिल्ली: सौदी अरेबियातील दम्माम येथील किंग फहद आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या हल्ल्यात दोन जण ठार झाले आणि दोघे जखमी झाले आहेत. मृतांमध्ये एका भारतीय नागरिकाचा समावेश आहे, अशी माहिती सौदी अधिकाऱ्यांच्या हवाल्याने रियाधमधील भारतीय दूतावासाने गुरूवारी (दि. २२ ऑक्टोबर) दिली. रियाधमधील भारतीय दूतावासाने सांगितले की, ते या घटनेबद्दल अधिक माहिती गोळा करत असून बाधित कुटुंबांशी संपर्क साधत आहेत. 'एक्स' (द) वर जारी केलेल्या निवेदनात दूतावासाने म्हटले आहे, आमच्या संवेदना आणि प्रार्थना मृतांच्या कुटुंबीयांसोबत आहेत आणि आम्ही जखमींच्या लवकर बरे होण्याची कामना करतो. परराष्ट्र मंत्रालयाच्या एका निवेदनात म्हटले आहे, आम्ही सौदी अरेबियातील नागरी आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवर होत असलेल्या सततच्या हल्ल्यांचा तीव्र निषेध करतो. यामध्ये २१ ऑक्टोबर रोजी दम्मम येथील किंग फहद आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि पूर्व प्रांतातील सौदी अरामकोच्या शायबाह तेल क्षेत्रावर झालेल्या हल्ल्यांचाही समावेश आहे. दुर्दैवाने, या हल्ल्यांमुळे नागरिकांचा मृत्यू झाला असून काही जण जखमी झाले आहेत.

जरांगे पाटलांनी अधिकृत तक्रार द्यावी–बावनकुळे

नागपूर: मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केलेल्या कथित ५०० कोटी रुपयांच्या ऑडिओ क्लिपबाबत आणि त्यांना अडकवण्याच्या षड्यंत्राबाबत जर त्यांच्याकडे ठोस पुरावे असतील, तर त्यांनी केवळ माध्यमांत बोलण्यापेक्षा पोलिस ठाणे किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचा सल्ला महसूल मंत्री चंद्रशेख बावनकुळे यांनी दिला. नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या दौऱ्यादरम्यान माध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे यांनी जरांगेंच्या ऑडिओ क्लिपवर स्पष्टीकरण देण्यासोबतच जमिनीच्या सामाधिक सातबा–यावरील दस्तनोंदणीबाबत घेतलेला ऐतिहासिक निर्णय, मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे 'रेझिम चेंज'चे भाकीत आणि संजय राऊत यांच्या विधानांवर सडकून टीका केली. मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषदेत ऐकवलेल्या ५०० कोटींच्या कथित ऑडिओ क्लिपवर बोलताना बावनकुळे म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कालच जाहीर सभेत आपली भूमिका मांडली असून कोणाशीही अशा प्रकारचा आर्थिक व्यवहार झाला नसल्याचे स्पष्ट केले आहे. जर जरांगे पाटलांना असे वाटत असेल की हे आंदोलन बदनाम करण्यासाठी किंवा त्यांना अडकवण्यासाठी कट रचला जात आहे, तर त्यांनी रीतसर तक्रार द्यावी.

लडाख विकास परिषद बरखास्त

लडाख: केंद्रशासित प्रदेश लडाखमधील एका महत्त्वपूर्ण प्रशासकीय घडामोडीत, लडाख स्वायत्त पहाडी विकास परिषद, कारगिलच्या (एलएएचडीसी कारगिल) काही प्रमुख सदस्यांनी राजीनामा दिल्यानंतर आणि जिल्ह्याच्या सीमांचे पुनर्गठन झाल्यानंतर, नायब राज्यपालांच्या प्रशासनाने या परिषदेला त्वरित बरखास्त करण्याचा आदेश दिला आहे. एलएएचडीसी कारगिल ही या केंद्रशासित प्रदेशातील एकमेव निवडून आलेली संस्था होती. राज्यपालांच्या (तळपरळ घींरी डरशपर) प्रवक्त्याने सांगितले की, हे विसर्जन आदेश २० ऑक्टोबर २०२६ रोजी एलएएचडीसी कारगिलचे मुख्य कार्यकारी कौन्सिलर, तीन कार्यकारी कौन्सिलर आणि इतर सहा कऊन्सिलरांनी दिलेल्या राजीनाम्यांचा विचार करून देण्यात आले आहेत.

राज्यात तातडीने चारा छावण्या सुरु करा!

बाळासाहेब थोरात यांची मागणी; शेतकऱ्यांसह शेतमजुरांच्या उपजीविकेचा प्रश्न गंभीर

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून महाराष्ट्र सरकारने तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात. जनावरांसाठी इतर भागांतून किंवा परराज्यांतून चारा उपलब्ध करून द्यावा. दुष्काळाच्या संकटात सरकारने शेतकऱ्यांसोबतच शेतमजुरांच्या पाठीशीही खंबीरपणे उभे राहावे, अशी मागणी माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे. शेजारील कर्नाटक राज्यात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा छावण्या सुरू



करण्यात आल्या असून, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही तातडीने उपाययोजना करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर भाष्य करताना थोरात म्हणाले की, राज्यात दुष्काळाचे भीषण संकट निर्माण होत असून, पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. यंदाचा खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला आहे. सोयाबीनसारखी पिके शेतातून काढण्यासाठी चार ते पाच हजार रुपये खर्च करावा लागत आहे. मात्र, उत्पादनातून शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरत नसल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. पिकेच उभी नसल्याने ▶▶ पान २ वर

महाराष्ट्रात ऑक्टोबर अखेर पावसाची शक्यता



मुंबई । प्रतिनिधी

राज्यासाठी दिलासादायक हवामान अंदाज समोर आला आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस महाराष्ट्रातील काही भागांत पाऊस होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

राज्यात सध्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी अडचणीत सापडला आहे. रब्बी हंगामाची पेरणी झाली असून परतीचा चांगला पाऊस पडावा, अशी ▶▶ पान २ वर

मनोज जरांगे यांचा 500 कोटींचा बॉम्ब!

● जरांगेंनी ऐकवली राज्याला हादरवणारी ऑडिओ क्लिप, राजकारण तापले

जालना । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर ५०० कोटींच्या आरोपांचा बॉम्ब फोडत एक ऑडिओ क्लिप ऐकवली. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारण पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. या ऑडिओ पुराव्यानंतर महायुतीमधील नेते, तसेच शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार आणि मंत्र्यांनी आक्रमक होत यावर प्रत्युत्तर दिले आहे. प्रताप सरनाईक, दादा भुसे, संजय शिरसाट, उदय सामंत आणि नवनाथ बन यांनी या प्रकरणाची थेट एसआयटी चौकशी करण्याची मागणी केली. एकनाथ शिंदेंना बदनाम करण्यासाठी जरांगेंना कुणी सुपारी दिली का? अशा संशय शिंदे गटातील नेत्यांकडून उपस्थित केला जात आहे.

गुरूवारी मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेत थेट ऑडिओ बॉम्ब टाकला. यामध्ये शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्फत मनोज जरांगेना ५०० कोटी पोहोचवल्याचा उल्लेख आहे. तसेच भाजपकडून षडयंत्र रचले जात असल्याचा दावा देखील मनोज जरांगेंनी केला. मनोज जरांगे म्हणाले की, 'सलग तीन वर्षापासून आजपर्यंत माझ्याविरोधात षडयंत्र सुरू आहे. हे षडयंत्र माझ्या माय–बाप समाजापुढे जायला पाहिजे. हे प्रकरण किती मोठे आहे, मी किती वेदना सहन करत आलो आहे, हे मराठा समाजापुढे गेले पाहिजे. मराठ्यांचे आंदोलन अन्याय करून बंद पाडायचे, जाणून बुजून मराठ्यांना त्रास द्यायचा. कसे षडयंत्र रचले जात



आहे, हे मराठा समाजापुढे येणार आहे. निवडणुकीच्या काळामध्ये तसेच उपोषणाच्या काळात देखील षडयंत्र झाले. आंदोलनाच्या काळातही षडयंत्र झाले. किती मोठे डाव रचले जात आहेत, हे यातून कळत आहे. राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक मराठा समाजाने हे लक्षात घ्यावे. माझ्यासोबत दुष्मनासारखे वागत आहेत. एवढ्या भयंकर रूपाचे षडयंत्र ▶▶ पान २ वर

बदनामी करण्याचे षडयंत्र–उदय सामंत

मनोज जरांगे पाटील यांनी व्हायरल केलेल्या ऑडिओ क्लिपवरून मंत्री उदय सामंत यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. या ऑडिओ क्लिपची उच्चस्तरीय चौकशी करून आवाजाची सत्यता तपासली पाहिजे, अशी मागणी सामंत यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. या क्लिपमध्ये भाजपशी संबंधित व्यक्ती असल्याचे सांगितले जात असून, भाजपने याबाबत खुलासा करावा, असे आवाहनही सामंत यांनी केले आहे. चांगल्या पद्धतीने सुरू असलेले मराठा आंदोलन बदनाम करण्याचा किंवा ते चिरडण्याचा प्रयत्न झाला होता का, याची चौकशी झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

दूध का दूध, पानी का पानी झाले पाहिजे–मंत्री शिरसाट

मनोज जरांगे पाटील यांनी जे सांगितले आहे, त्याची चौकशी झालीच पाहिजे. दूध का दूध, पानी का पानी झाले पाहिजे, अशी आमची भूमिका आहे, असे मंत्री संजय शिरसाट म्हणाले. जी काही क्लिप आहे, त्यातील आवाजाची एकदा तपासणी झाली पाहिजे. या क्लिपमधील सर्वजण एकमेकांशी कॉन्फरन्स कॉलवर बोलत असल्याचे दिसत आहे. जरांगे पाटील म्हणत आहेत, त्याप्रमाणे हे एखादे ठरवून केलेले षडयंत्र असेल, तर त्याची सत्यता समोर आली पाहिजे. मुळात जरांगे पाटील यांनी ही क्लिप दाखवून एक चांगले काम केले आहे. अशा प्रकारची षडयंत्र रचली जातात, हे त्यांनी प्रसारित केलेल्या क्लिपमधून समोर आल्याचे दिसत आहे.

तीन वर्ष का थांबले?–दादा भुसे

यावर शिंदेसेनेचे नेते आणि राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मनोज जरांगे यांना सगळे पुरावे पोलिस प्रशासनाला द्यावे, त्या पुराव्यांची पोलिस चौकशी करतील अशी प्रतिक्रिया दिली. जरांगे कोर्टात देखील चौकशीची मागणी करू शकतात. आम्ही देखील पाठपुरावा करू. चौकशीतून जे समोर येऊल, ते महाराष्ट्रासमोर असेल, असे दादा भुसे म्हणाले. तीन वर्षांपासून हा विषय असेल तर थांबले का? आत्ताच ती माहिती का समोर आली ? असा सवाल दादा भुसे यांनी विचारला.

नेहा बोरा यांच्या याचिकेवरील सुनावणी पूर्ण

दिल्ली हायकोर्ट आज आदेश देणार

दिल्ली । वृत्तसंस्था



'ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन'च्या अध्यक्षा नेहा बोरा यांनी पोलिसांच्या नोटीसला आव्हान देणाऱ्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयात गुरूवारी (दि. २२) सुनावणी झाली. न्यायमूर्ती सुब्रमणियम प्रसाद यांनी बोरा आणि पोलिसांच्या वकिलांचे सुमारे तीन तास म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, या याचिकेवरील आपला आदेश राखून ठेवला.

नेहा बोरा यांनी विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी बजावलेल्या एका नोटीसला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या नोटीसद्वारे त्यांना १०,००० रुपयांचा वैयक्तिक बंधपत्र सादर करण्यास आणि शांतता राखण्यास सांगण्यात आले होते. सुनावणीदरम्यान, नेहा बोरा यांच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांनी असा युक्तिवाद केला ▶▶ पान २ वर

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक

८४२ केंद्रांवर आज सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ साठी छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यांत आज शुक्रवारी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होत आहे. यासाठी साहित्याचे वितरण पूर्ण करण्यात आले आहे. विभागातील ८४२ मतदान केंद्रांवर मतदान होणार असून, त्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर, जालना,



बीड, लातूर, धाराशिव, परभणी, नांदेड व हिंगोली या आठही जिल्ह्यांत निवडणूक यंत्रणा कार्यरत आहे. संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी हे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहत आहेत. त्यांच्या नियंत्रणाखाली तालुकानिहाय वितरण केंद्रांवरून मतदान पथकांना साहित्याचे वाटप करून नेमून दिलेल्या मतदान केंद्रांकडे गुरूवारी रवाना करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील मतदान केंद्रांसाठी नियुक्त पथकांना शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय येथून मतदान साहित्याचे वितरण करण्यात आले. जिल्ह्यातील अन्य ▶▶ पान २ वर

आंदोलनांनी काहीही साध्य होणार नाही.!

अमित शहा यांचा राहुल गांधींवर हल्लाबोल

दिल्ली । वृत्तसंस्था



देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत आंदोलने करण्यासाठी विरोधी पक्ष इतर राज्यांमधून पक्षाचे कार्यकर्ते गोळा करत आहे. मात्र, आंदोलनांनी काहीही साध्य होणार नाही. तसेच निवडणूका जिंकायच्या असल्यास विरोधकांनी जनतेच्या समस्या समजून घेतल्या पाहिजे, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेससह विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. तसेच भाजप ३० वर्षे सत्तेत राहील असा दावाही केला.

नवी दिल्लीत यमुना पुनरुज्जीवनासाठी ८,९४१ कोटींच्या ३३ प्रकल्पांचे अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्यावरही निशाणा साधला. अमित शहा म्हणाले, राजकीय कसरती आणि जमावशाहीचा ▶▶ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२२ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: १६.५० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
३,३२३	३,६००	३,४६१

ज्वारी/हायब्रिड: १३.५० क्विंटल

३,५१०	८,००१	५,८०६

मका/लोकल: १.०० क्विंटल

२,३००	२,३००	२,३००

तूर : १.०० क्विंटल

१०,०००	१०,०००	१०,०००

उडीद : १४.०० क्विंटल

९,६००	९,८५१	९,७३७

बाजरी: १८.५० क्विंटल

३,१५१	५,१००	३,८०७

मुग: १.५० क्विंटल

८,५००	९,६१०	९,०५५

सोयाबीन: १९०.५० क्विंटल

६,७५१	७,०६७	७,०००

हरभरा: ३.०० क्विंटल

६,५००	६,६०१	६,५५०

एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांना आता पाचवी संधी

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचा निर्णय; महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या पाठपुराव्याला यश

नाशिक । प्रतिनिधी

एमबीबीएसच्या प्रथम वर्षात उत्तीर्ण होण्यासाठी संघर्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांना आता अतिरिक्त परीक्षेची संधी मिळणार आहे. राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (एनएमसी) आणि पदवी वैद्यकीय शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांना एक विशेष अतिरिक्त संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रथम वर्षाच्या परीक्षेत चार प्रयत्नांनंतरही उत्तीर्ण होऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना पाचव्या प्रयत्नाची संधी उपलब्ध होणार असून, त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्यंकट गिते यांच्या पुढाकाराने आणि विद्यापीठ प्रशासनाच्या पाठपुराव्यामुळे हा निर्णय झाल्याचे सांगण्यात आले.

विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक समस्या, वैयक्तिक अडचणी तसेच काही अपवादात्मक परिस्थितींमुळे निर्धारित



प्रयत्नांमध्ये परीक्षा उत्तीर्ण होता येत नाही. अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची शक्यता असते. विद्यार्थ्यांची ही अडचण लक्षात घेऊन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडे अतिरिक्त संधी देण्याची मागणी केली होती. यासाठी वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. कुलगुरू डॉ. व्यंकट गिते यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी अतिरिक्त संधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता मांडली होती. विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी घेतलेले परिश्रम, त्यांच्यावरील मानसिक ताण आणि शिक्षणाचा आर्थिक भार लक्षात घेता हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. अतिरिक्त संधीमुळे विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देऊन उत्तीर्ण होण्याची ▶▶ पान २ वर

सौरव दास आणि आशुतोष यांना दिल्ली पोलिसांचे समन्स



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने सौरव दास, अजिंक्य शिंदे आणि आशुतोष रांका यांना समन्स बजावले आहे. जबाब नोंदवण्यासाठी गुरूवारी दुपारी १२ वाजता त्यांना राजौरी गार्डन येथील गुन्हे शाखेच्या कार्यालयात हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले.

सीजेपी नेते सौरव दास, आशुतोष रांका आणि अजिंक्य शिंदे यांच्या अडचणी कमी होण्याचे नाव घेत नाहीत. ▶▶ पान २ वर

अग्रलेख

राजधानीबाहेरची कूटनीती की उद्योगपतींच्या हितांना प्राधान्य?

रुबिओ यांच्या मुंबई-जामनगर दौऱ्याने भू-अर्थकारणाचे महत्त्व अधोरेखित; मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणाच्या निष्पत्तीची कसोटी

जागतिक राजकारणात आता केवळ राष्ट्रप्रमुखांच्या भेटी, राजधानीतील भव्य स्वागतसमारंभ आणि औपचारिक बैठका यांवरून राजनैतिक संबंधांचे मूल्यमापन करता येत नाही. ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळी यांमधील हितसंबंध जागतिक मुत्सद्देगिरीची दिशा ठरवत आहेत. भू-राजकारणाबरोबरच भू-अर्थकारणाचे महत्त्व वाढत असताना अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांच्या ऑक्टोबरमधील भारत दौऱ्याने नव्या प्रश्नांना जन्म दिला आहे. मुंबईतील उच्चस्तरीय चर्चा आणि गुजरातमधील जामनगर येथील रिलायन्सच्या तेलशुद्धीकरण प्रकल्पाला दिलेली भेट यामुळे या दौऱ्याच्या आर्थिक आणि राजनैतिक उद्दिष्टांची चर्चा स्वाभाविक आहे.

रुबिओ यांनी २० ऑक्टोबरला मुंबईत भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याशी चर्चा केली. ऊर्जा सुरक्षा, व्यापार, गुंतवणूक आणि भारत-अमेरिका धोरणात्मक सहकार्य हे या संवादाचे महत्त्वाचे विषय होते. त्यानंतर उद्योगजगताशी संवाद आणि जामनगरमधील ऊर्जा प्रकल्पाच्या भेटीमुळे या दौऱ्याचा आर्थिक पैलू ठळकपणे समोर आला. त्यामुळे या भेटीकडे केवळ प्रोटोकॉलच्या चष्म्यातून नव्हे, तर भारताच्या आर्थिक हितांच्या कसोटीवरून पाहणे आवश्यक आहे. परदेशी उच्चपदस्थ पाहुण्याने नवी दिल्लीऐवजी मुंबईत बैठक घेणे म्हणजे भारताचा राजनैतिक अवमान झाला, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. भारत सरकारनेही परदेशी नेत्यांच्या भेटी राजधानीबाहेर आयोजित करण्याची प्रथा असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे बैठकीचे ठिकाण हेच राष्ट्रीय प्रतिष्ठेचे एकमेव मापदंड ठरू शकत नाही. मात्र, याचा अर्थ प्रोटोकॉल आणि राजनैतिक संकेतांना काहीच महत्त्व नाही, असाही नाही. आंतरराष्ट्रीय संबंधांत कोणती बैठक कुठे होते, तिची घोषणा कोणत्या देशाकडून होते, कोणत्या स्तरावरील नेत्यांचा सहभाग असतो आणि चर्चेतून कोणते ठोस निर्णय पुढे येतात, या सर्व बाबींना महत्त्व असते. परराष्ट्रमंत्र्यांची समकक्ष भेट झाली, एवढ्यावर संपूर्ण दौऱ्याचे यश ठरत नाही. त्या भेटीत भारताने कोणत्या मुद्द्यांवर आपली भूमिका ठामपणे मांडली आणि अमेरिकेकडून कोणत्या बाबींमध्ये सकारात्मक प्रतिसाद मिळवला, याचीही चिकित्सा व्हायला हवी. जामनगरमधील रिलायन्सच्या तेलशुद्धीकरण प्रकल्पाला दिलेली भेट हा या दौऱ्यातील महत्त्वाचा भाग होता. ऊर्जा क्षेत्रातील भारताची क्षमता, औद्योगिक पायाभूत सुविधा आणि जागतिक बाजारपेठेतील स्थान यांचे महत्त्व त्यामुळे अधोरेखित झाले. खासगी उद्योगांच्या माध्यमातून होणारे सहकार्य हे आधुनिक अर्थकारणाचा अविभाज्य भाग आहे. त्याकडे संशयाने पाहण्याची आवश्यकता नाही; परंतु त्याचे मूल्यमापन करताना सार्वजनिक हिताचा प्रश्न बाजूला ठेवता येणार नाही. अमेरिकेला ऊर्जा सहकार्याचा विस्तार करायचा असेल आणि भारताला व्यापार, गुंतवणूक व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांत अधिक संधी मिळवायच्या असतील, तर दोन्ही देशांमधील व्यवहार परस्परहिताचे असले पाहिजेत. एखाद्या उद्योगसमूहाला मिळणाऱ्या संधी आणि देशाला मिळणारा व्यापक आर्थिक फायदा यांची गल्लत होता कामा नये. औद्योगिक भेटींमधून रोजगार, तंत्रज्ञान हस्तांतरण, गुंतवणूक आणि ऊर्जा सुरक्षिततेला किती चालना मिळते, हे महत्त्वाचे आहे. मग प्रश्न असा की, या दौऱ्यातून भारताला नेमके काय मिळाले? व्यापारविषयक चर्चेत कोणती प्रगती झाली? ऊर्जा आयातीबाबत भारताच्या स्वायत्त निर्णयक्षमतेला कितपत मान्यता मिळाली? संरक्षण आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील सहकार्य किती पुढे गेले? या प्रश्नांची उत्तरे अधिकृत निष्पत्ती आणि प्रत्यक्ष करारांतून मिळायला हवीत. केवळ उद्योगपतींशी झालेल्या भेटींची छायाचित्रे किंवा राजनैतिक चर्चेची औपचारिक विधाने देशाच्या यशाचा पुरावा ठरू शकत नाहीत.

गेल्या दशकात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने विविध देशांशी संबंध विस्तारण्यावर भर दिला आहे. भारताने जागतिक व्यासपीठांवर आपली भूमिका मांडली, अनेक देशांशी आर्थिक आणि धोरणात्मक भागीदारी वाढवली आणि ग्लोबल साउथच्या प्रश्नांनाही महत्त्व दिले. या प्रयत्नांचे मूल्यमापन करताना भारताच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय सहभागाची दखल घेणे आवश्यक आहे. तथापि, एखाद्या नेत्याची जागतिक प्रतिमा आणि देशाच्या परराष्ट्र धोरणाची प्रत्यक्ष फलनिष्पत्ती या दोन स्वतंत्र बाबी आहेत. परदेशी नेते भारतात येतात, उद्योगांना भेट देतात किंवा उच्चस्तरीय चर्चा करतात, एवढ्यावर भारताची राजनैतिक ताकद सिद्ध होत नाही. त्यातून देशाच्या अर्थव्यवस्थेला काय लाभ होतो, धोरणात्मक स्वायत्तता किती टिकते आणि सामान्य नागरिकांच्या हिताला किती बळ मिळते, हे अधिक महत्त्वाचे आहे. अमेरिकेसारख्या सामर्थ्यशाली देशाशी संबंध दृढ करताना भारताने स्वतःच्या ऊर्जा गरजा, व्यापारातील हितसंबंध आणि आंतरराष्ट्रीय भूमिकेचा समतोल राखला पाहिजे. मैत्री असावी; पण ती समानतेच्या पायावर. सहकार्य वाढावे; पण त्यासाठी राष्ट्रीय हिताशी तडजोड होऊ नये. हीच स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची खरी कसोटी आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात संवेदनशील कागदपत्रे, वादग्रस्त व्यक्ती आणि राजकीय घडामोडी यांचा उल्लेख अनेकदा एकत्र केला जातो. एप्स्टीन प्रकरणाशी संबंधित कागदपत्रांच्या संदर्भातही तथ्ये, आरोप आणि राजकीय तर्क यांच्यातील फरक स्पष्ट ठेवणे आवश्यक आहे. ठोस पुरावे नसताना एखाद्या नेत्याच्या दौऱ्याचा किंवा राजनैतिक निर्णयाचा अशा प्रकरणाशी संबंध जोडणे योग्य ठरणार नाही. परंतु, अप्रमाणित दावे नाकारणे म्हणजे सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारू नयेत, असेही नाही. कोणत्याही सरकारच्या निर्णयांबाबत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सार्वजनिक हिताच्या आधारे प्रश्न विचारणे हा लोकशाहीचा अधिकार आहे. व्यक्तींच्या प्रतिमांवर आधारित चर्चा करण्याऐवजी उपलब्ध कागदपत्रे, अधिकृत विधाने आणि पडताळता येणारे पुरावे यांच्या आधारे निष्कर्ष काढणे हीच जबाबदार पत्रकारिता आहे. रुबिओ यांचा मुंबई-जामनगर दौरा हा बदलत्या भू-अर्थकारणाचे उदाहरण आहे. परराष्ट्र धोरण आता केवळ राजधान्यांतील बैठकांपुरते मर्यादित राहिलेले नाही. औद्योगिक केंद्रे, ऊर्जा प्रकल्प, तंत्रज्ञान कंपन्या आणि गुंतवणुकीची ठिकाणेही राजनैतिक संवादाचे महत्त्वाचे केंद्र बनत आहेत. त्यामुळे या बदलाकडे भारताच्या औद्योगिक सामर्थ्याची संधी म्हणून पाहता येईल. पण या संधीचे यश केवळ दौऱ्याच्या स्वरूपावरून ठरणार नाही. भारताला मिळणारे व्यापारविषयक फायदे, ऊर्जा सुरक्षितता, तंत्रज्ञानातील सहकार्य आणि धोरणात्मक स्वायत्तता या ठोस निकषांवर त्याचे मूल्यमापन करावे लागेल. राजधानीत बैठक झाली नाही म्हणून भारताची प्रतिष्ठा कमी झाली, असे म्हणणे जितके घाईचे आहे, तितकेच उद्योगपतींच्या भेटी झाल्या म्हणून भारताने मोठी राजनैतिक आघाडी मिळवली, असे घोषित करणेही अपरिपक्व ठरेल. प्रश्न दिल्लीचा की मुंबईचा हा नाही; प्रश्न भारताच्या हिताचा आहे. जागतिक व्यासपीठावर भारताची प्रतिमा उंचावणे महत्त्वाचे असले, तरी त्या प्रतिमेचे रूपांतर देशाच्या आर्थिक आणि धोरणात्मक लाभांत झाले पाहिजे. भू-अर्थकारणाच्या नव्या युगात भारताची खरी ताकद स्वागतसमारंभांच्या भव्यतेत नव्हे, तर वाटाघाटींच्या परिणामांत आणि राष्ट्रीय हित जपण्याच्या क्षमतेत मोजली जाईल.

सरकारी कामात अडथळा आरोपीला सहा महिन्यांची शिक्षा

माजलगाव न्यायालयाचा निकाल; १० हजारांचा दंड

माजलगाव । प्रतिनिधी

तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार विभागात कार्यरत असणारे सहाय्यक महसुल अधिकारी वसंत कर्मा वसावे हे शासकीय काम करत असतांना तालुक्यातील सोन्नाथडी येथील रहिवासी असणारा आरोपी विष्णु गणपत गोरे याने कार्यालयात येऊन वसावे यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला होता यावेळी माजलगाव शहर पोलीस स्टेशन ला वसावे यांच्या फिर्यादीवरून कलम १३२, ३५३ अन्वेय गुन्हा दाखल करण्यात आला होता या प्रकरणाबाबत माजलगाव येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायधिश डॉ उमेशचंद्र जे. मोरे साहेब यांच्या न्यायालयात सुनावणी झाली तेंव्हा न्यायालयाने दोन्ही बाजुचा युक्तीवाद व सबळ पुराव्या अभावी आरोपी विष्णु गणपत गोरे ला दोषी ठरवत भारतीय न्याय संहितेनुसार कलम १३२,आणि ३५३ अन्वेय सहा महीण्याची शिक्षा व दोन्हीं कलमाखाली प्रत्येकी ५,००० रूपये असा एकुण १०,००० हजार रूपयांचा दंड ठोठावला असुन दंड न भरल्यास अतिरिक्त कारावास अशी शिक्षा सुनावली असुन यावेळी सरकारी पक्षाच्या वतीने सरकारी वकील ॲड .पी.एन. मस्कर यांनी बाजू मांडली . त्यांना सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड . आर. ए. वाघमारे आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. एस .एस. प्रधान यांनी सहकार्य केले तर तपास कामात मदत पोलिस हवलदार राहुल गोरे आणि पेरावी अधिकारी पि .एस. आय. मगन वाघ सहकार्य केले.

मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज; सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत मतदान

जालना । प्रतिनिधी

०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया शांततेत, पारदर्शक आणि सुरळीत पार पाडण्यासाठी जालना जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आशिमा मित्तल यांनी आज (दि.२२) रोजी परतूर उपविभागातील मतदान पथकांना हिरवी झेंडी दाखवून मतदान केंद्रांकडे रवाना केले.



परतूर येथील तहसील कार्यालयात यावेळी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रेंगे, तहसीलदार भारत गंगावणे तसेच निवडणूक कामकाजातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून मतदान प्रक्रिया शांततेत, निःपक्षपाती आणि पारदर्शकपणे पार पाडण्याच्या सूचना दिल्या. मतदान दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दूपारी ४ या वेळेत होणार असून, सर्व पात्र पदवीधर मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. मतदान पथकांना मतदान पेट्या, मतपत्रिका, मतदार यादी, आवश्यक नमुने, नोंदवह्या, शिक्के तसेच इतर निवडणूक साहित्य नियमानुसार सुपूर्द करण्यात आले. साहित्य स्वीकारल्यानंतर त्याची तपासणी करून जिल्ह्यातील सर्व तालुका तहसिल कार्यालयातून देखील मतदान पथके आपापल्या नियुक्त मतदान केंद्रांकडे रवाना झाली आहेत. मतदानासाठी आवश्यक साहित्याचे वितरण करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मतदान प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक मतदान पथकात नियुक्त मतदान अधिकारी व कर्मचारी यांच्यासह आवश्यकतेनुसार सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. मतदान केंद्रांवर पोहोचल्यानंतर संबंधित पथके मतदान केंद्राची तयारी, उपलब्ध सुविधांची तपासणी आणि मतदान साहित्याची पडताळणी करणार आहेत. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आज मतदान पथकांचे तिसरे प्रशिक्षण घेवून मतदानाची संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्याबाबत त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मतदान केंद्रांवरील व्यवस्था, मतदारांची ओळख पडताळणी, मतदानाची नोंद आणि मतदान संपल्यानंतरची कार्यवाही याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या. मतदान प्रक्रियेदरम्यान आचारसंहितेचे पालन करणे तसेच कोणत्याही प्रकारच्या अनियमिततेला प्रतिबंध करणे यावर भर देण्यात आला. मतदारांना मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीही प्रशासनाकडून तयारी करण्यात आली आहे. दिव्यांग आणि इतर गरजू मतदारांना नियमानुसार आवश्यक सहाय्य देण्याच्या सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच मतदान केंद्रांवर स्वच्छता, पिण्याचे पाणी, दिशादर्शक फलक आणि आवश्यक मूलभूत सुविधांची उपलब्ध ठेवण्यावर भर देण्यात आला आहे.मतदानाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय ठेवण्यात आला असून, संवेदनशील मतदान केंद्रांबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार आवश्यक खबरदारी घेतली जाणार आहे. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतदान यंत्रे व निवडणूक साहित्य विहित प्रक्रियेनुसार जमा करण्याबाबतही पथकांना सूचना देण्यात आल्या आहेत.मतदारांनी निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.



महिला सन्मान योजनेचे हाफ तिकीट मशीन मधून बंद?

जालना । प्रतिनिधी

सरकारने राज्यामध्ये महिला सन्मान योजना लागू केली परंतु आता मशीन मधून हाफ तिकीट बंद करण्यात आले यामुळे एनसी एमसी कार्ड पण स्कॅन होत नसल्यामुळे महिलेला व मुलींना फुल टिकीट देण्यात येत आहे . परंतु काही महिला व मुलांकडे पैसे नसल्यास सदरील महिला बसमधून खाली उतरावा लागत आहे.एनसीएमसी स्कॅन होत नसल्यामुळे महिलेकडून फुल टिकीट वसूल केल्या जात आहे . तिकीट घेण्याच्या देण्याच्या कारणावरून वाहक व महिला मध्ये वादीवाद होत आहे. तसेच कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींना पण बस खाली उतरून देण्यात येत आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या योजनेसंदर्भात लवकरात लवकर महिला सन्मान योजनेचे हाफ तिकीट मशीन मधून सुरू करण्यात यावे अशी मागणी महिला सन्मान योजनेच्या महिला कडून करण्यात येत आहे.

पान १ वरून...

महाराष्ट्रात ऑक्टोबर

शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. दरम्यान, राज्यातील ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे सरकारकडून शेतकरी, मजूर आणि सामान्य नागरिकांना विविध माध्यमातून मदत केली जात आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, सध्या पावसाला पोषक वातावरण तयार होत आहे. बंगालच्या उपसागरात नव्या कमी दाबाचे क्षेत्र तयार होत असून, २६ ऑक्टोबरनंतर तेथे चक्रीवादळाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यानंतर २७ ऑक्टोबरपासून देशातील काही भागांत मध्यम ते मुसळधार पाऊस पडू शकतो. आंध्र प्रदेशात २९ ऑक्टोबरच्या आसपास पावसाची शक्यता असून, महाराष्ट्रातही महिन्याच्या अखेरीस काही ठिकाणी पाऊस होण्याचा अंदाज आहे. आयएमडीने पुढील चार आठवड्यांसाठीही हवामानाचा अंदाज दिला आहे. दक्षिण भारतासह पूर्व आणि ईशान्य भारतातील काही भागांत पाऊस होऊ शकतो. मध्य भारतातील अनेक भाग तसेच पूर्व उत्तर प्रदेशातही पावसाची शक्यता आहे. पश्चिम बंगाल आणि ओडिशातही पाऊस पडण्याचा अंदाज आहे. दरम्यान, राज्यातील सुमारे ५३ लाख हेक्टर रब्बी क्षेत्रापैकी केवळ २० ते २५ लाख हेक्टर क्षेत्रावरच पेरणी झाली आहे. त्यामुळे परतीचा पाऊस न झाल्यास पेरणी झालेल्या पिकांनाही मोठा फटका बसू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगल्या पावसाची गरज आहे. ऑक्टोबरअखेरीस पावसाची शक्यता व्यक्त झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा जाग्या झाल्या आहेत. आगामी काही दिवसांत पाऊस प्रत्यक्षात किती पडतो, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

राज्यात तातडीने चारा

शेतात काम करणाऱ्या शेतमजुरांच्या हाताला काम मिळेनासे झाले आहे. रोज कमवून रोज खाणाऱ्या मजुरांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. दुष्काळाचा परिणाम केवळ शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होत नसून ग्रामीण भागातील संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होत आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना मदत करण्याबरोबरच शेतमजुरांसाठीही ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे थोरात यांनी सांगितले. आगामी दहा महिने अतिशय कठीण जाण्याची शक्यता असून, राज्यासमोर दुष्काळाचे मोठे आव्हान उभे आहे. पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा, पशुधनाचे संरक्षण आणि शेतकरी व शेतमजुरांच्या उपजीविकेचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. त्यामुळे संकटाची तीव्रता वाढण्याची वाट न पाहता सरकारने आतापासूनच नियोजन करून मदतीची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. शेतकरी आधीच आर्थिक संकटात असताना कर्जमाफीच्या टप्प्यांमुळे व्याज आणि बँक व्यवहारांशी संबंधित नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. या समस्यांवर सरकारने तातडीने मार्ग काढावा आणि अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना वेळोवेळी आर्थिक पाठबळ द्यावे, अशी मागणीही थोरात यांनी केली. दुष्काळाच्या सुरुवातीलाच सरकारवर थेट आरोप करण्याची भूमिका नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी, शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी ठोस पावले उचलावीत, असे म्हटले. आता केवळ आश्वासनांपेक्षा पाणी, चारा आणि रोजगाराच्या प्रश्नांवर प्रत्यक्ष उपाययोजना करण्याची गरज असल्याचे त्यांच्या मागणीतून अधोरेखित झाले आहे.

मनोज जरांगे यांचा

का रचले जात आहे? याचा शोध पंतप्रधानांनी, मुख्यमंत्र्यांनी आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी घ्यावा', असेही जरांगे यावेळी म्हणाले. या ऑडिओ क्लिपमध्ये आर्थिक गोष्टींवर देखील भाष्य केल्याचं दिसून येत आहे. त्याचबरोबर 'मराठवाड्यात जरांगेंच्या विरोधात बोलायला लोक तयार आहेत, जरांगेंना आवरलं नाही तर मराठवाड्यात तुम्हाला गिळून टाकेल, त्याला डॅमेज करायचा प्रयत्न सुरू करायला हवा', असेही या ऑडिओ क्लिपमध्ये बोलणाऱ्या दोन व्यक्तींच्या संभाषणातून दिसून येत आहे. यात एका महिलांचा आवाज दिसून येत आहे. त्यात ती महिला सांगतेय की, 'जरांगे पाटील यांना ऑलरेडी ५०० कोटी रुपये पोहोचले आहेत. श्रीकांत शिंदेमार्फत हे पैसे दिले आहेत. आता जरांगे पाटील विधानसभेत आमच्या फायद्याचे राहतील, नाही राहणार याबाबतचं माझं मत वेगळं आहे. कॅलक्यूलेशन वेगळं आहे. बाकी तुम्ही जो विचार करत आहात'. त्याचबरोबर जरांगे पर्सनल फडणवीस यांना टार्गेट करत असल्याचा उल्लेख या क्लिपमध्ये आहे. जरांगे यांना भाजपचे नेते मदत करत असल्याचा उल्लेख देखील यामध्ये आहे.

आंदोलनांनी काहीही

वापर करून जनतेचा कौल नाकारता येणार नाही. ज्या राज्यांत तुम्ही सत्तेत आहात, तिथे लोककल्याणकारी योजना राबवा अन्यथा उरलेल्या ठिकाणांहूनही तुमचा राजकीय पाया पूर्णपणे नष्ट होईल. काँग्रेसच्या नकारात्मक राजकारणामुळे पुढील ३० वर्षे त्यांना सरकार स्थापन करता येणार नाही, असा दावा त्यांनी केला. तसेच, केरळ, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणामध्ये विरोधकांचे सरकार येते तेव्हा ईव्हीएम आणि निवडणूक आयोग चालतात. मात्र स्वतःचा पराभव झाला की त्यावर प्रश्न उपस्थित केले जातात, अशी टीकाही त्यांनी केली. दिल्लीत काँग्रेससह विरोधी पक्षांकडून एक पूर्णपणे वेगळा राजकीय खेळ खेळला जात आहे. भाजप एकापाठोपाठ एक सत्तेवर येत आहे. यामुळे व्यथित होऊन त्यांनी मतचोरीचे कारण पुढे केले आहे. भाजपला जनादेश नाही आणि ते मते चोरतात, असे ते म्हणत आहेत, असा टोलाही त्यांनी लगाविला.

औरंगाबाद विभाग पदवीधर

तालुक्यांतही संबंधित मतदान केंद्रांसाठी नियुक्त पथकांना साहित्य देण्यात आले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २१७, जालना ८९, परभणी ७६, हिंगोली ३६, नांदेड १२०, लातूर ८८, धाराशिव ७६ व बीड जिल्ह्यात १४० अशी एकूण ८४२ मतदान केंद्रे आहेत. या निवडणुकीसाठी ४१ उमेदवार रिंगणात असून, एकूण ३ लाख २६ हजार ७०१ मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. मतदारांनी मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदवून मतदान करावयाचे आहे. मतदान प्रक्रिया शांततेत, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय राखावा. संबंधित अधिकारी - कर्मचाऱ्यांनी सतर्क राहून मतदानाच्या दिवशी उद्भवणाऱ्या अडचणींवर तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी जी. श्रीकांत यांनी दिले आहेत.

नेहा बोरा यांच्या याचिकेवरील

की, ही नोटीस पूर्णपणे असंवैधानिक आणि कायदेशीरदृष्ट्या त्रुटीपूर्ण आहे. त्यांनी स्पष्ट केले की, कनॉट प्लेस येथे निदर्शनांचे आवाहन नेहा बोरा यांनी केलेले नव्हते. यावर न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला, तुम्ही उच्च न्यायालयात उपस्थित करत असलेला मुद्दा राज्यघटनेच्या कलम २२ शी संबंधित आहे. तो कलम १३५(३) अंतर्गत दंडाधिकाऱ्यांच्या अधिकारक्षेत्रात येत नाही का? या नोटीसचा मूळ उद्देश असा आहे की, चौकशीदरम्यान तुम्ही दंडाधिकाऱ्यांचे समाधान करावे. तुमच्याकडून बंधपत्र का घेतले जाऊ नये. आम्ही या प्रकरणाची सविस्तर तपासणी करावी, की केवळ कलम १२६ अंतर्गत बजावलेली नोटीस आणि त्यात नमूद केलेल्या कारणांपुरतेच मर्यादित राहावे. यावर उत्तर देताना वकील गोपाल शंकरनारायणन यांनी असा युक्तिवाद केला की, ही नोटीस केवळ 'कट-अँड-पेस्ट' (एका ठिकाणाहून दुसरीकडे जशीच्या तशी उचललेली) असल्याचे दिसते. वैयक्तिक बंधपत्र मागण्यापूर्वी पूर्ण चौकशी होणे अनिवार्य आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठाचा निकालही या भूमिकेला पुष्टी देतो. जोपर्यंत अशी चौकशी पूर्ण होत नाही, तोपर्यंत द३डाधिकारी बंधपत्राची मागणी करू शकत नाहीत. वकिलांनी असाही युक्तिवाद केला की, कनॉट प्लेस येथील निदर्शने एका वेगळ्या गटाने आयोजित केली होती, तर नेहा बोराने केवळ मंडी हाऊस येथे एकत्र येण्याचे आवाहन केले होते. नोटीसमध्ये 'परवानगीशिवाय राष्ट्रध्वज फडकवल्याचा' उल्लेख आहे, परंतु तिरंगा फडकवण्यासाठी कोणत्याही परवानगीची आवश्यकता नसते. शिवाय, ज्या दंडाधिकाऱ्यांनी (मॅजिस्ट्रेट) ही नोटीस जारी केली आहे, ते स्वतः पोलीस अधिकारी आहेत आणि ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेवरून सुरू करण्यात आली होती. १६ ऑक्टोबर रोजी मंडी हाऊस येथे एका कार्यक्रमात उपस्थित असताना नेहा बोरा हिला ताब्यात घेण्यात आले होते. तिचा आरोप आहे की, तिला एका अज्ञात ठिकाणी नेण्यात आले आणि त्यानंतर आर. के. पुरम पोलीस ठाण्यात रात्रभर ठेवल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी ६:०० वाजता सोडून देण्यात आले. नोटीसमध्ये तिच्यावर मंडी हाऊस येथे घोषणाबाजी केल्याचा, मनाई आदेश असतानाही जंतरमंतरजवळ निदर्शनांत सहभागी झाल्याचा आणि लोकांना कनॉट प्लेस येथे निदर्शने करण्यासाठी प्रवृत्त केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. आपल्या याचिकेत नेहा बोरा यांनी म्हटले आहे की, शांतता भंग होण्याचा धोका होता, हे सिद्ध करण्यासाठी नोटीसमध्ये कोणतीही ठोस कारणे, विशिष्ट घटना किंवा कालमर्यादा दिलेली नाही.

सौरव दास आणि आशुतो

दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने त्यांना समन्स बजावले आहे. पोलिसांनी त्यांना आपले जबाब नोंदवण्यासाठी गुन्हे शाखेसमोर हजर राहण्याचे निर्देश दिले. त्यांना राजौरी गार्डन येथील गुन्हे शाखेच्या कार्यालयात उपस्थित राहावे लागले. यापूर्वी बुधवारी विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयाने रांका आणि सौरव यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक हमीपत्रावर आणि जामीनपत्रावर तिहार तुरुंगातून मुक्त करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयात दोन्ही नेत्यांनी लेखी प्रतिज्ञापत्र सादर केले होते. जोपर्यंत जंतर-मंतर परिसर डी-नोटिफाईड राहील, तोपर्यंत ते तेथे शांतता भंग करणार नाहीत किंवा कोणत्याही आंदोलनाचे आवाहन करणार नाहीत, असे त्यांनी या प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. दिल्ली पोलिसांनी त्यांच्या न्यायालयीन कोठडीत आणखी तीन दिवसांची वाढ करण्याची मागणी केली होती. त्यांच्या जबाबांमध्ये विसंगती असून, कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडू शकते, असा युक्तिवाद पोलिसांनी केला होता. मात्र, त्यांच्या वकिलांनी बिनशर्त माफी मागितल्याने आणि दिलेल्या आश्वासनांचा विचार करून दंडाधिकाऱ्यांनी त्यांना आणखी कोठडीत ठेवण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २३ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. दोन्ही नेत्यांच्या सुटकेचे सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके आणि कायदेशीर विभागाच्या प्रमुख रत्ना सिंह यांनी स्वागत केले. तसेच आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनीही न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करत संपूर्ण देश त्यांच्या पाठीशी उभा असल्याचे म्हटले.

एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांना

संधी मिळेल आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यास मदत होईल. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनीही या प्रकरणी राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडे पाठपुरावा करण्यात आल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या हितासाठी सकारात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने विद्यापीठ प्रशासन कायम प्रयत्नशील राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या नियमानुसार एमबीबीएसचा अभ्यासक्रम इंटर्नशिपसह दहा वर्षांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक आहे. यापूर्वी प्रथम वर्ष उत्तीर्ण होण्यासाठी प्रवेशापासून चार वर्षांच्या आत किंवा चार प्रयत्नांमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक होते. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करून शैक्षणिक वर्ष २०१९-२० आणि २०२०-२१ या दोन बॅचमधील विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून पाचव्या प्रयत्नाची संधी देण्यात आली होती. आता राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या बैठकीतील निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून पुढील सर्व बॅचमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विशेष अतिरिक्त संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना एकूण पाच प्रयत्न करता येणार आहेत. या निर्णयामुळे प्रथम वर्षाच्या परीक्षेत अपयश आलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा संधी मिळणार असून, वैद्यकीय शिक्षणातील त्यांचे भवितव्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीने हा निर्णय दिलासादायक ठरणार आहे.

जाहीर प्रगटन

मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज ४१६/२०२६

बाळासाहेब व इतर विरुध्द निरंक

मार्फत-ॲड.ए.एम.सय्यद

अर्जदार :- १. बाळासाहेब गंगाराम बांदल, रा. नायगाव मयुर ता. पाटोदा जि. बीड, २. सत्यभामाबाई गंगाराम बांदल, रा. नायगाव मयुर ता. पाटोदा जि. बीड

विरूध्द

कोणीही नाही

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत गंगाराम गेणा बांदल, हे रा. मौजे जाण्याचीवाडी तहत कारेगाव ता. पाटोदा जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **गंगाराम गेणा बांदल**, यांचा मृत्यु दिनांक २८/०६/२०१९ रोजी माउली हॉस्पीटल बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार कं. १ हा मयताचा एकुलता एक मुलगा आहे तसेच अर्जदार कं. २ ही मयताची पत्नी आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत **गंगाराम गेणा बांदल**, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख **दि. १९ नोव्हेंबर २०२६.**

स्वाक्षरीत/-
आदेशावरुन,
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.

स्वाक्षरीत/-
क.लिपीक

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर २०२६
३

थोडक्यात



महात्मा फुले विद्यालयात दीपक रासवे यांचा सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील एका शेतकरी कुटुंबातील दीपक रमेश रासवे यांची 'एम.एस.एफ.' (महाराष्ट्र सुरक्षा बल) आणि राज्य राखीव पोलीस दलात (डठझऋ) निवड झाल्याबद्दल गुरुवारी महात्मा फुले विद्यालयाच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. मोठेवाडी हे गाव शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर राहिले आहे. एका सामान्य शेतकरी कुटुंबातून येऊन दीपक रासवे यांनी कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या निवडीमुळे मोठेवाडी गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या सत्कार प्रसंगी माजी सरपंच अविनाश गोंडे,समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री, पत्रकार राजाभाऊ पास्टे,सुदर्शन हिवरकर, अंगदराव खेत्री,संभाजी पास्टे,विलास खेत्री, विद्यालयाचे मुख्याध्यापक रामराज मुंडे, शिक्षक यु. के. राठोड, कैलास दांडगे, महादेव मगर, नारायण कांबळे यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी दीपक यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तालुक्यातील पदवीधर परिवर्तनाच्या बाजूने डॉ. प्रतापसिंह पाटील यांचीच चर्चा–डावकर

बीड । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर विभागातील पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यात राजकीय वातावरण तापू लागले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या नावाची तालुक्यात जोरदार चर्चा सुरू असून, पदवीधर मतदार त्यांना पहिली पसंती देतील, असा विश्वास किरण डावकर यांनी व्यक्त केला आहे.



सुशिक्षित बेरोजगार तरुण, विद्यार्थी आणि पदवीधरांच्या प्रश्नांना न्याय मिळावा, रोजगाराच्या संधी वाढाव्यात आणि पदवीधरांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले जावेत, अशी अपेक्षा मतदारांकडून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. प्रतापसिंह पाटील यांना विजयी करण्यासाठी कार्यकर्ते आणि समर्थक प्रयत्नशील असल्याचे डावकर यांनी सांगितले.

घाटसावळी–नाळवंडीतून मोठ्या मताधिक्याचे लक्ष्य!

बीड तालुक्यातील घाटसावळी आणि नाळवंडी सर्कलमधून डॉ. प्रतापसिंह पाटील यांना मोठ्या मताधिक्याने आघाडी मिळवून देण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करणार आहोत. पदवीधर मतदारांशी संवाद साधून त्यांच्या समस्या आणि अपेक्षा जाणून घेतल्या जातील. सुशिक्षित बेरोजगारांचे प्रश्न, रोजगाराच्या संधी आणि पदवीधरांचे हक्क यांना प्राधान्य देणाऱ्या नेतृत्वाला संधी मिळावी, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असे किरण डावकर यांनी स्पष्ट केले.

संपूर्ण बीड तालुक्यात डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. पदवीधर मतदार त्यांना पहिली पसंती देतील, असा आम्हाला विश्वास आहे. घाटसावळी–नाळवंडी परिसरातून त्यांना मोठे मताधिक्य मिळवून देण्यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्नांची पराकाष्ठा करू, असा विश्वास किरण डावकर यांनी व्यक्त केला.

खासगी रुग्णालयांवर प्रशासनाची करडी नजर

गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियेसाठी आता शल्यचिकित्सकांची परवानगी अनिवार्य

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत आरोग्य विभागाचा आढावा; घटत्या लिंग गुणोत्तरावरही उपाययोजनांचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आणि विविध आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच आरोग्य विभागाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीत जिल्ह्यातील महिलांच्या गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रिया, घटते लिंग गुणोत्तर, सोनोग्राफी केंद्रांची तपासणी आणि विविध आरोग्य योजनांबाबत अत्यंत महत्त्वपूर्ण व कठोर निर्णय घेण्यात आले आहेत. प्रशासनाने घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे आता वैद्यकीय क्षेत्रातील कारभारात अधिक पारदर्शकता येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बीड जिल्ह्यामध्ये महिलांच्या गर्भाशय काढण्याच्या (हिस्टेरेक्टोमी) शस्त्रक्रियांचे प्रमाण हा नेहमीच एक संवेदनशील आणि कळीचा मुद्दा राहिला आहे. यावर कायमस्वरूपी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाने आता अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. यापुढे जिल्ह्यातील कोणत्याही खासगी किंवा शासकीय रुग्णालयामध्ये गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया करायची असल्यास, त्याला जिल्हा शल्यचिकित्सकांची (सिव्हिल सर्जन) पूर्वपरवानगी घेणे सक्तीचे करण्यात आले आहे. बैठकीतील सादरीकरणादरम्यान शासकीय रुग्णालयांच्या तुलनेत खासगी रुग्णालयांमध्ये या शस्त्रक्रियांचे प्रमाण लक्षणीयरीत्या जास्त असल्याचे निदर्शनास आले. शासकीय रुग्णालयांमध्ये अत्यंत आवश्यक असल्यासच आणि योग्य त्या वैद्यकीय प्रक्रियेचे पालन करूनच या शस्त्रक्रिया केल्या जातात. मात्र, खासगी रुग्णालयांचा वाढता आकडा चिंताजनक असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या तफावतीवर तीव्र शब्दांत विचारणा केली. अनावश्यक शस्त्रक्रियांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली २५ फेब्रुवारी रोजीच एक जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, आता प्रत्येक शस्त्रक्रियेची सविस्तर माहिती प्रशासनाला देणे रुग्णालयांना बंधनकारक असणार आहे.

दुसरीकडे, जिल्ह्यातील घटते लिंग गुणोत्तर हा प्रशासनासाठी मोठा चिंतेचा विषय ठरत आहे. चालू वर्षात एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर ८६२ इतके नोंदवले गेले आहे. हे प्रमाण वाढवण्यासाठी आणि बेकायदेशीर गर्भलिंग निदान रोखण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय दक्षता पथकाची विशेष बैठकही यावेळी पार पडली. जिल्ह्यात १६ एप्रिल ते १५ मे या काळात सोनोग्राफी केंद्रांची कसून तपासणी करण्यात आली असून, अचानक तपासणी करण्यासाठी प्रत्येकी तीन डॉक्टरांचा समावेश असलेली तब्बल १७ पथके स्थापन करण्यात आली आहेत. पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत एकूण २८ न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात आली होती. त्यापैकी २३ प्रकरणे निकाली निघाली असून ७ प्रकरणांमध्ये संबंधितांना शिक्षाही झाली आहे. मात्र, बेकायदेशीर लिंगनिदान रोखण्यासाठी 'डिकॉय' (ऊशाल्रे) केसेस करण्यासाठी सामान्य नागरिक स्वतःहून पुढे येत नसल्याची खंत अधिकाऱ्यांनी या बैठकीत व्यक्त केली. लिंग गुणोत्तर वाढवण्यासाठी सध्या १० तालुकास्तरीय कार्यशाळा, ग्रामसभा आणि 'आकाशवाणी बीड'च्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जात आहे.

या आढावा सत्रात शालेय मुलींचे आरोग्य आणि लसीकरणावरही सविस्तर चर्चा झाली. १४ ते १५ वर्षे वयोगटातील शालेय मुलींसाठी सुरू असलेली लसीकरणाची मोहीम आता ३१ डिसेंबरपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयांच्या माध्यमातून हे लसीकरण वेगाने सुरू आहे. तसेच जिल्ह्यात गोवर-रुबेलाचे २४८ संशयित रुग्ण आढळले असून त्यापैकी १०२ जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आले असले, तरी सुदैवाने याची कोणतीही मोठी साथ नसल्याचे आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. याव्यतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडील पी. एम. राहत कॅशलेस योजना आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'मिशन एड्स सुरक्षा' अभियानाचाही आढावा घेण्यात आला. या अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीची बैठक पार पडली.

दरम्यान, आरोग्य विभागाने नुकत्याच राबवलेल्या एका संवेदनशील आणि अभिनव उपक्रमाचे या बैठकीत विशेष कौतुक करण्यात आले. नवरात्रोत्सवाच्या काळात जिल्ह्यातील सिव्हिल हॉस्पिटल आणि महिला रुग्णालयात मुलीला जन्म देणाऱ्या मातांना साडी आणि नवजात बालिकेला कपडे वाटप करण्याचा विशेष उपक्रम राबवण्यात आला. समाजात मुलींच्या जन्माचे स्वागत अधिक आनंदाने आणि उत्साहाने व्हावे, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबवल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या धडक आढाव्यामुळे आरोग्य विभागाच्या कामकाजाला आता नवी दिशा मिळाली असून, सर्वच स्तरांवर कामाला गती आली आहे.

शहरातील जलकुंभ कालबाह्य ; बीड शहर बचाव मंच

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेच्या वतीने करावयाचे, अटल अमृत जल योजनेतील काम अपूर्ण राहिलेले आहे. या संदर्भात काही नेते, लोकप्रतिनिधी जरी कोर्टात गेलेले असले तरी, एक गोष्ट सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे वास्तविकपणे ज्यावेळी हे लोक कोर्टात गेलेले आहेत त्या वेळेपर्यंत अटल अमृत जल योजनेतून बांधण्यात आलेले सर्व जलकुंभ व पाणी पुरवठा यंत्रणा ही अतिशय दुरावस्थेला पोहोचलेली आहे. योग्य वेळी या योजनेतून निर्माण केलेल्या सामग्रीच्या वापराची सुरुवात न करण्यात आल्यामुळे तसेच नियमित वापराअभावी ही सर्व यंत्रणा धूळ खात व गंज खात पडलेली आहे. वेळेवर व नियमितपणे वापर न झाल्यामुळे या सर्व जलकुंभ,जलवाहिन्या तसेच पुरवठा यंत्रणा सामग्री यांची गुणवत्ता खराब



झालेली आहे. म्हणजेच नजीकच्या भविष्यकाळामध्ये या सर्व यंत्रणेचे डीमोलीशन करणे गरजेचे होऊ शकते. मग अशा परिस्थितीमध्ये आणि इतक्या उशिरा नगरपालिकेच्या विरोधात कोर्टामध्ये जाऊन जरी कोर्टाचा निर्णय आला तरी या सर्व पाणीपुरवठ्याच्या यंत्रणेचा



प्रत्यक्षात काहीही उपयोग होणार नाही. मग कोर्टकचेऱ्यांचा बनाव करून खरोखरंच प्रत्यक्षात जनतेच्या घरापर्यंत पाणी येणार आहे का ?? अटल अमृत जल योजना घोटाळ्याची जबाबदारी कोणाची ?

या घोटाळ्यात कोणाकोणाचे हात गुंतलेले आहेत ? शहरातील सर्वच भागांमध्ये नियमितपणे लोकांच्या घरापर्यंत पाणी कधी येणार ? आता पडलेल्या दुष्काळामध्ये पाणीपुरवठा कसा होणार, या वरील उपाययोजना काय आहेत ?

बीड शहरातील आता कार्यान्वित असलेले अनेक जलकुंभ (उदाहरणार्थ, राजीव गांधी चौकातील जलकुंभ) तांत्रिकदृष्ट्या हे कालबाह्य झालेले आहेत. म्हणजेच तांत्रिकदृष्ट्या यांचा उपयुक्तता कालावधी बऱ्याच काळापूर्वी संपुष्टात आलेला असून यां सर्वच जुन्या झालेल्या जल कुंभांची वापर मुदत फार पूर्वीच संपुष्टात आलेली आहे. आता यांचा जो वापर चालू आहे तो नियम बाह्य , कालबाह्यही आहे. वास्तविक शहराची वाढलेली व्याप्ती व लोकसंख्येचा विस्तार लक्षात घेऊन सर्व जल कुंभांचे पुनर्निर्माण होणे गरजेचे आहे. म्हणजेच शहरांमध्ये नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी फार मोठे आव्हान स्वीकारण्याची आज गरज निर्माण झालेली आहे. या सर्व परिस्थितीवर बीड शहरातील जनतेने जागृत होणे व अतिशय गंभीर होणे गरजेचे आहे.

पान ६ वरून...

माजलगावच्या जय महेश

काम करताना कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातात का,असा प्रश्न या घटनेनंतर उपस्थित होत आहे.विजेच्या धक्क्यामुळे तरुण कामगाराचा मृत्यू झाल्याने कामाच्या ठिकाणी विद्युत सुरक्षेच्या उपाययोजनांची तपासणी करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. दरम्यान,या दुर्घटनेची सखोल चौकशी करून घटनेमागील नेमके कारण स्पष्ट करावे,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या प्रकरणात संबंधित प्रशासनाकडून काय कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

माजलगाव–तेलगाव रस्त्यासाठी आता

कामाच्या गुणवत्तेबाबत उपस्थित होणारे प्रश्न यामुळे प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. वारंवार होणारे अपघात आणि त्यातून होणारी जीवितहानी ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

निवेदन देऊनही केवळ थातुरमातुर काम करून प्रश्न सुटणार नाही. रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासून निकृष्ट कामाची चौकशी करावी, आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्यात आणि रस्त्याचे दर्जेदार काम तातडीने पूर्ण करावे, अशी ठाम मागणी मोहनदादा जगताप यांच्या वतीने करण्यात आली आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने आता गांभीर्याने लक्ष द्यावे. अन्यथा, २६ ऑक्टोबर रोजी पात्रुड येथे रास्ता रोको आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येईल, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षाने घेतली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड नको, माजलगाव–तेलगाव रस्त्याचे दर्जेदार काम तातडीने पूर्ण करा, अशी ठाम मागणी करत मोहनदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली रस्त्याच्या प्रश्नावर आरपारची लढाई लढण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

संभाजीनगरची चोरीची बुलेट

संजय डुले उपस्थित होते.

दरम्यान जिल्हा वाहतूक शाखेचे पथक पेट्रोलिंग करत असताना संशयास्पद बुलेट निदर्शनास आली. त्यानंतर पोलिसांनी सदर वाहनाची तपासणी केली असता, या वाहनाबाबत छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस स्टेशन सिडको छत्रपती संभाजीनगर गु.र.नं.०२४४/२५ दि.२८.०४.२०२६ अन्वये दाखल झाल्याचे ॲपवरुन दिसून आले. त्यानुसार जिल्हा वाहतूक शाखेने सदर बुलेट ताब्यात घेवून पुढील कार्यवाहीस्तव शिवाजीनगर पोलीसांच्या ताब्यात दिले.

या कारवाईमुळे वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून करण्यात येणार्या पेट्रोलिंगचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. या प्रकरणात पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.

वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी आम्ही सतर्क– वैभव पाटील

जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी आवाहन केले आहे की, वाहतूक नियंत्रणासोबतच संशयास्पद वाहनांची तपासणी आणि नियमित पेट्रोलिंगवर भर दिला जात आहे. वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी वाहतूक शाखेचे पथक सतर्क असून, संशयास्पद वाहनांवर बारकाईने नजर ठेवली जात आहे. तसेच नागरिकांनी देखील कोणतेही वाहन खरेदी करत असतांना कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी करुनच खरेदी करावे.

मराठवाडा पदवीधर

आणि व्यवस्थेसह संबंधित केंद्रांकडे रवाना करण्यात आले.

मतदान प्रक्रिया सुरळीत , पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक तयारी करण्यात आली आहे . मतदान केंद्रांवरील व्यवस्थेचा आढावा घेत नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी रवाना करण्यात आले. यावेळी बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नायब तहसीलदार सुरेंद्र डोके , सुहास हजारे , अण्णासाहेब वंजारे , प्रशांत सुपेकर यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मुंबई-बीड मार्गावरील

अशी मागणी पिंगळे यांनी केली.

''सणासुदीच्या काळात सर्वसामान्य प्रवाशांची आर्थिक लूट होणे योग्य नाही. खासगी ट्रॅव्हल्सच्या मनमानी भाडेवाढीला आळा घालून प्रवाशांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत,'' अशी भूमिका विपुल बाळासाहेब पिंगळे यांनी मांडली.

या तक्रारीनंतर परिवहन मंत्र्यांनी परिवहन आयुक्तांना तत्काळ कार्यवाहीच्या सूचना दिल्याने मुंबईबीड मार्गावरील प्रवाशांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीमध्ये नवदुर्गा महोत्सव उत्साहात संपन्न; दांडियामध्ये माता पालकांचा उत्स्फुर्त सहभाग

माजलगाव । प्रतिनिधी

फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेज, माजलगाव येथे सोमवार, दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ रोजी नवदुर्गा महोत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. भारतीय संस्कृती, परंपरा आणि देवी दुर्गेच्या नऊ रूपांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे आई दुर्गेच्या नऊ रूपांचे दर्शन आणि साडेतीन शक्तिपीठांचा आकर्षक देखावा. या देखाव्यातून महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविण्यात आले.या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक, लक्ष्मीनारायण मुंदडा, गोपाळराव डाके, संस्थेचे संचालक जगदीशजी चांडक, रमेशजी चांडक, भगवानराव लाटे, शेख अलीभाई,सौ.माया चांडक,अंकित चांडक, महेश चांडक, विवेक कांकरिया, अक्षय बंब यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.

प्री-प्रायमरी विभागातील प्री-नर्सरी, नर्सरी, ज्युनिअर केजी, सीनियर केजी आणि इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी 'नवदुर्गा – कलर्स सेलिब्रेशन' हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. विविध रंगांच्या माध्यमातून देवीच्या नऊ रूपांची ओळख करून देण्यात आली. तसेच इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी उत्साहपूर्ण दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.या महोत्सवाचे आणखी एक खास आकर्षण म्हणजे माता-पालकांसाठी आयोजित करण्यात आलेला दांडिया कार्यक्रम. यामध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आनंद लुटला. कार्यक्रमात आई-मुलगी, सासू-सून, नणंद-भावजय



आणि जावा-जावा या नात्यांमधील उत्कृष्ट जोडीसाठी विविध बक्षिसे ठेवण्यात आली होती. तसेच उत्कृष्ट मेकअपसाठीही पारितोषिक देण्यात आले.उत्कृष्ट आई आणि मुलगी चे पारितोषिक श्रद्धा होरमाळे व अनन्या होरमाळे,उत्कृष्ट सासू सून जोडी माया खुर्पे व रिद्धी खुर्पे,बेस्ट स्टेपसाठी सौ.गंगा बदने,नणंद भावजय जोडीचे पारितोषिक आर्या जाधव व सुजाता जाधव आणि बेस्ट जावा जावा जोडीचे पारितोषिक वैष्णवी नाईकवाडे व राधा नाईकवाडे यांनी मिळवले तर उत्कृष्ट मेअकअप चे पारितोषिक अमृता गरड यांनी मिळवले.दांडिया खेळामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कु.वीरा शिनगारे व प्रणिती सुरवसे या मुलांनाही बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमामुळे पालकांमध्ये आनंद, उत्साह आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले.

या संपूर्ण आयोजनातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख झाली, तर पालकांना एकत्र येऊन आनंदाचे क्षण अनुभवण्याची संधी मिळाली. भक्ती, संस्कृती, पारंपरिक वेशभूषा आणि दांडियाच्या उत्साहाने कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

भक्तीचे रंग, संस्कृतीचा साज, साडेतीन शक्तिपीठांचा देखावा आणि विद्यार्थी व पालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेजचा नवदुर्गा महोत्सव आनंदमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्यध्यापिका सौ.सारिका बजाज मॅडम ,सौ.ऐश्वर्या चांडक मॅडम ,उपमुख्यध्यापक सचिन गायकवाड सर, उपमुख्याध्यपिका ज्योती बनसोडे मॅडम,रमेश बाहेती सर यांच्यासह शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या संपूर्ण आयोजनाचे प्रमुख म्हणून सोनल होन्ना मॅडम आणि प्रियंका जाधव यांनी काम पाहिले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्योती बनसोडे मॅडम यांनी केले. सूत्रसंचालन शीतल काकडे मॅडम यांनी केले तर आभार रोहिणी जोशी मॅडम यांनी मानले.

बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सव व पंचम वर्धापनदिना निमित्त श्रीनिवास कल्याणम महोत्सवाचे आयोजन

शोभायात्रा, श्रीनिवास कल्याणम महोत्सवासह तीन दिवसीय धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील बायपास रोड, गजानन नगर येथील श्री बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सव व पंचम वर्धापनदिना निमित्त श्री बालाजी सेवा फाउंडेशनच्या वतीने दि. २३ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत श्री सहस्र कलशाभिषेक व श्रीनिवास कल्याणम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवसीय महोत्सवात भव्य शोभायात्रा, विविध धार्मिक विधी, विष्णुसहस्रनाम पारायण, श्री व्यंकटेश स्वामी कल्याणोत्सव, होमहवन, महाआरती आणि महाप्रसाद आदी कार्यक्रम होणार आहेत.

शुक्रवारी शोभायात्रेने महोत्सवाचा प्रारंभ

शुक्रवार,दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८:०० वाजता शहरातील झेंडा चौक, पाटील गल्ली येथून शोभायात्रेला प्रारंभ होणार आहे. शोभायात्रेत स्थानिक युवक-युवतींचे ढोलपथक आकर्षण ठरणार आहे. पुरुषांनी पांढरा शर्ट-पँट किंवा धोतर, तर महिलांनी चुनरी साडी अथवा लाल रंगाची काठपदर साडी परिधान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सकाळी १०.३० वाजता विश्वक्सेन आराधना, पुण्याहवाचन, अंकुरार्पण, यागशाळा प्रवेश, मूर्ती कुंभ आराधना, अग्निप्रतिष्ठा व नित्य होमम हे धार्मिक विधी होतील. सायंकाळी ५:०० वाजता विष्णुसहस्रनाम पारायण, यागशाळा आराधना, नित्य होमम, पालखीसह मंदिर प्रदक्षिणा, वाहनसेवा, नैवेद्य, बलिहरणम व आरती होणार आहे.

शनिवारी श्री व्यंकटेश स्वामी कल्याणोत्सव

शनिवार,दि.२४ ऑक्टोबर रोजी सकाळी ९:०० वाजता विश्वक्सेन आराधना व पुण्याहवाचनाने कार्यक्रमांना प्रारंभ होईल. त्यानंतर उत्सवांग स्नपनम, १०८ कलशाभिषेक, विशेष अलंकार



सेवा, यागशाळा आराधना, लक्ष्मीनारायण होमम, नित्य पूर्णाहुती, बलिहरणम व नैवेद्य आदी विधी पार पडतील. सायंकाळी ५:०० वाजता श्री व्यंकटेश स्वामी कल्याणोत्सवांतर्गत भव्य विवाह सोहळा होणार असून, त्यानंतर नैवेद्य व महाआरती होईल.

रविवारी धार्मिक विधी व महाप्रसाद

रविवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वाजता यागशाळा प्रवेश, मूर्ती कुंभ आराधना, महा नरसिंह सुदर्शन होमम, महापूर्णाहुती, बलिहरणम व महाआरती हे कार्यक्रम होतील. सायंकाळी ५:०० वाजता श्रीदेवी-भूदेवीसमेत श्री व्यंकटेश स्वामींचा पुष्पयोग, महा नैवेद्य व महाआरती होणार आहे. यावेळी संत व पुजारी यांच्या मंगलमय आशीर्वचनांसह अर्चकांचा सन्मान करण्यात येणार आहे.

रविवारी सायंकाळी ७:०० वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या महाप्रसादाचे यजमान म्हणून श्री रामस्वरूपजी खंडेलवाल व श्री कारभारजी काळे यांनी जबाबदारी स्वीकारली आहे.

भाविकांना सहभागी होण्याचे आवाहन

श्री बालाजी मंदिराच्या ब्रह्मोत्सव व पंचम वर्धापनदिनानिमित्त आयोजित या धार्मिक महोत्सवामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. श्री बालाजी सेवा फाउंडेशनच्या वतीने सर्व भाविक, भक्तपरिवार व नागरिकांनी तीन दिवसीय महोत्सवात सहभागी होऊन श्री बालाजींचे दर्शन घ्यावे आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. चोकट भव्य दिव्य शोभायात्रा निघणार असून यात बहुसंख्येने महिला,पुरुष व भक्तांची उपस्थित राहणार आहेत तसेच २३ तारखेला सायंकाळी ५:०० वाजता १००० भक्तांच्या वतीने विष्णू सहस्त्रनामा पठण होनार आहे

खासगी काट्यावर वजन केलेला ऊस नाकारता येणार नाही!

काटामारी रोखण्यासाठी साखर आयुक्तालयाचा नवा आदेश; तफावत आढळल्यास शेतकऱ्यांना तक्रारीचा अधिकार

पुणे / प्रतिनिधी

साखर कारखान्यांकडून होणाऱ्या ऊस वजनातील काटामारीला आळा घालण्यासाठी साखर आयुक्तालयाने कठोर भूमिका घेतली आहे. वैधमापन शास्त्र विभागाने प्रमाणित केलेल्या कोणत्याही खासगी वजन काट्यावर वजन केलेला ऊस साखर कारखान्यांना नाकारता येणार नाही. खासगी आणि कारखान्याच्या वजन काट्यावरील वजनात तफावत आढळल्यास शेतकऱ्यांना तक्रार दाखल करता येणार असून, या तक्रारींची सुनावणी घेतली जाणार आहे. साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी काटामारी रोखण्यासाठी नव्याने आदेश जारी केला आहे.

राज्यातील साखर कारखान्यांच्या वजन काट्यांबाबत सातत्याने आक्षेप घेतले जात आहेत. खासगी वजन काट्यावर वजन करून आणलेल्या उसाचे वजन कारखान्याच्या काट्यावर कमी भरत असल्याच्या तक्रारी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत. खासगी काट्यावरील वजन ग्राह्य धरले जात नसल्यामुळे काटामारीला संरक्षण मिळत असल्याचा आरोपही शेतकरी संघटनांनी



केला आहे. यापूर्वी साखर आयुक्तालयाने कारखान्यांना वजनाबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. मात्र, त्याकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी पुन्हा वाढल्याने आयुक्तालयाने नव्याने निर्देश दिले आहेत. खासगी वजन काट्यावर ऊसाचे वजन केले म्हणून संबंधित शेतकरी, वाहनचालक किंवा मुकादमाविरोधात साखर कारखान्यांना कारवाई करता येणार नाही. अशा शेतकऱ्यांच्या उसाच्या गाड्यांचा क्रम जाणीवपूर्वक डावलणे, पुढील वर्षीची ऊस नोंदणी रद्द करणे किंवा सभासदत्व रद्द करणे, असे प्रकारही बेकायदेशीर ठरतील, असे साखर आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे खासगी वजन काट्याचा वापर केल्याच्या कारणावरून शेतकऱ्यांना लक्ष्य करणाऱ्या कारखान्यांच्या मनमानीला चाप बसण्याची शक्यता आहे. अधिकृत खासगी काट्यावर वजन करून आणलेल्या उसाला प्रवेश नाकारणे ही अनुचित प्रथा ठरू शकते, असा वैधमापन शास्त्र विभागाने अभिप्राय दिला आहे. खासगी वजन काटा आणि साखर कारखान्याच्या वजन काट्यावरील उसाच्या वजनात तफावत आढळल्यास शेतकऱ्यांना संबंधित यंत्रणेकडे तक्रार दाखल करता येईल. प्रादेशिक साखर सहसंचालक तसेच वैधमापन शास्त्र विभागाच्या जिल्हा उपनियंत्रकांकडे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तक्रारींची चौकशी करून सुनावणी घेतली जाणार आहे. 'वैधमापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११' नुसार वजन काट्यांची पडताळणी आणि मुद्रांकनाची प्रक्रिया एकसमान असते. त्यामुळे वैधमापन शास्त्र विभागाने प्रमाणित केलेल्या अधिकृत खासगी

भरारी पथके असूनही काटामारीच्या तक्रारी

काटामारी रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. तरीही उसाच्या वजनाची नोंद तत्काळ न मिळणे, वजन प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव आणि खासगी व कारखान्याच्या काट्यावरील वजनात तफावत अशा तक्रारी शेतकरी संघटनांकडून केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर साखर आयुक्तालयाने उसाच्या वजनासाठी सुधारित मार्गदर्शक कार्यपद्धती जारी केली आहे. साखर कारखान्यांनी या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास वजन काट्यांबाबतचे वाद कमी होऊ शकतात. मात्र, आदेशांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत होते आणि शेतकऱ्यांना काटामारीविरोधात किती दिलासा मिळतो, हे आगामी गळीत हंगामात स्पष्ट होणार आहे.

वजन काट्यावर केलेले वजन केवळ खासगी काट्यावर वजन केले म्हणून अमान्य करता येणार नाही, अशी भूमिका विभागाने मांडली आहे.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१७०७ : ग्रेट ब्रिटनची पहिली संसदेची बैठक.
१७६४ : मुघल शासक मीर कासीम यांचा बक्सरच्या लढाईत पराभव झाला.
१८५० : अमेरिकेत पहिले राष्ट्रीय महिला हक्क संमेलन सुरु झाले.
१८९० : हरी नारायण आपटे यांनी 'करमणूक' या आपल्या साप्ताहिकातून स्फूट गोष्टी लिहिण्यास प्रारंभ केला आणि मराठी लघुकथेचा पाया घातला गेला.
१९०० : इंग्लिश क्रिकेटपटू डग्लस जार्डिन यांचा जन्म. (मृत्यू: १८ जून १९५८)
१९१० : अमेरिकेतील ब्लांश एस. स्कॉट या महिला मदती शिवाय एकट्या विमान उडविणाऱ्या पहिल्या वैमानिक बनल्या.
१९२४ : एडविन हबल यांनी देवयानी ही एक आकाशगंगा आहे असे प्रतिपादन केले.
१९३६ : लाइफ मॅगझिन हे फोटो मॅगझिन म्हणून पुन्हा प्रकाशित झाले.
१९४३ : नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी सिंगापूर येथे आझाद हिंद सेनेच्या अंतर्गत महिलांची 'झाशीची राणी ब्रिगेड' सेनेची स्थापना केली.
१९४४ : दुसरे महायुद्ध सोविएत लाल सैन्याने हंगेरीत प्रवेश केला.
१९४६ : न्यूयॉर्क येथे सयुक्त राष्ट्राची पहिली महासभा पार पडली.
१९४७ : गेर्टी कोरी आणि त्यांचे पती कार्ल कोरी हे पहिले असे दांपत्य होते ज्यांना चिकित्सक क्षेत्रातील नोबल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होत.
१९५५ : कोकोज आयलंड्स या बेटांचा ताबा इंग्लंडकडून ऑस्ट्रेलियाकडे देण्यात आला.
१९७१ : चीनने संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीत प्रथमच भाग घेतला.
१९७३ : संयुक्त राष्ट्रांनी निर्बंध घातल्यामुळे इस्त्रायल व सीरीयामधील युद्ध संपुष्टात आले.
१९९२ : आयबीएम सायमन हा पहिला स्मार्टफोन प्रकाशित करण्यात आला.
१९९७ : सामाजिक कार्यासाठीचे जर्मनीचे योजेफ ब्यूज पारितोषिक किरण बेदी यांना प्रदान
१९९९ : नागपूरचे संस्कृत महाकवी व संस्कृत पत्रकार डॉ. श्रीधर भास्कर वर्णेकर यांना या क्षेत्रातील कठोर तपश्चर्येबद्दल अप्पाशास्त्री राशिवडेकर पुरस्कार प्रदान.
२००४ : जपान येथे आलेल्या भूकंपामुळे सुमारे ८५ हजार नागरिक बेघर झाले होते.
२०१९ : भारतीय वायू दलाने जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या दोन ब्राह्मोस क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७८ : चन्नम्मा कित्तूरची राणी (मृत्यू: २१ फेब्रुवारी १८२९)
१८७९ : शंकर रामचंद्र तथा 'अहिताग्नी' राजवाडे वैदिक धर्माचे पुरस्कर्ते, पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, मीमांसक व भाष्यकार (मृत्यू: २७ नोव्हेंबर १९५२)
१८८२ : उद्योगपती वालचंद हिराचंद दोशी यांचा जन्म. (मृत्यू: ८ एप्रिल १९५३)
१८९७ : साहित्य अकादमी पुरस्कार विजेते बंगाली/इंग्लिश लेखक निराद सी. चौधरी यांचा जन्म. (मृत्यू: १ ऑगस्ट १९९९ लॅथबरी रोड, ऑक्सफोर्ड, इंग्लंड)
१८९८ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व केंद्रीय कामगार मंत्री तसचं, आंध्रप्रदेश राज्याचे माजी राज्यपाल खंडूभाई देसाई यांचा जन्मदिन.
१९०० : डग्लस जार्डिन इंग्लिश क्रिकेटपटू (मृत्यू: १८ जून १९५८)
१९२३ : लेखक नागनाथ संतराम तथा ना. स. इनामदार यांचा जन्म. (मृत्यू: १६ ऑक्टोबर २००२)
१९२३ : दामोदर दिनकर तथा मधुकाका कुलकर्णी प्रकाशन व्यवसायात नवनवीन प्रयोगांसाठी ख्याती मिळवलेले प्रकाशक, 'श्री विद्या प्रकाशन'चे संस्थापक (मृत्यू: २२ फेब्रुवारी २०००)
१९२३ : भारतीय-पाकिस्तानी भाषाशास्त्रज्ञ, लेखक आणि विद्वान असलम फारुखी यांचा जन्म. (मृत्यू: १५ जुन २०१६)
१९२४ : 'संगीतभूषण' पं. राम मराठे संगीतकार, गायक व नट (मृत्यू: ४ आक्टोबर १९८९)
१९२५ : भारतीय राज्य राजस्थान चे माजी मुख्यमंत्री व भारताचे माजी अकरावे उपराष्ट्रपती भैरोसिंह शेखावत यांचा जन्मदिन.
१९२६ : आध्यात्मिक गुरू सत्यनारायण राजू ऊर्फ सत्य साईबाबा यांचा जन्म. (मृत्यू: २४ एप्रिल २०११)
१९३० : अभिनेत्री आणि गायिका गीता दत्त यांचा जन्म. (मृत्यू: २० जुलै १९७२)
१९३७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते देवेन वर्मा यांचा जन्म. (मृत्यू: २ डिसेंबर २०१४)
१९४५ : शफी इनामदार अभिनेते व नाट्यनिर्माते (मृत्यू: १३ मार्च १९९६)
१९५७ : प्रख्यात भारतीय उद्योगपती, समाजसेवक आणि भारतातील सर्वात मोठी टेलिकॉम कंपनी एअरटेलचे अध्यक्ष सुनील मित्तल यांचा जन्मदिन.
१९७४ : भारतीय पत्रकार आणि लेखक अरविंद अडिगा यांचा जन्म.
१९८४ : अभिनेत्री अमृता खानविलकर यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१५ : डब्ल्यू. जी. ग्रेस इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: १८ जुलै १८४८)
१९५९ : अभिनेते व निर्माते नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर यांचे निधन. (जन्म: १२ मार्च १८९१)
१९६२ : भारतीय सर्वोच्च सैन्य शौर्य पुरस्कार परमवीर चक्र सन्मानित प्रख्यात भारतीय लष्कर सैनिक सुभेदार जोगिंदर सिंह यांचे निधन.
१९७० : सिंगापूर देशाचे पहिले अध्यक्ष युसूफ बिन इशक यांचे निधन. (जन्म: १२ ऑगस्ट १९१०)
१९७३ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित ब्रिटीश भारतीय क्रांतिकारक महिला तसचं, कलकत्ता येथील ४७ व्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा नेली सेनगुप्त यांचे निधन.
१९८९ : भारतीय-अमेरिकन अभिनेत्री मरले ओबर्नोन यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९११)
१९९९ : अर्थतज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या कुमुद सदाशिव पोरे यांचे निधन.
२००० : चित्रकार, कलासमीक्षक, महाराष्ट्राचे कलासंचालक बाबूराव सडवेलकर यांचे निधन. (जन्म: २८ जून १९२८ सावंतवाडी, सिंधुदुर्ग, महाराष्ट्र)
२०१२ : सुनील गंगोपाध्याय बंगाली कवी व कादंबरीकार (जन्म: ७ सप्टेंबर १९३४)

झेंडू लागवडीसाठी हेक्टरी खर्च आणि झेंडू शेतीचे नफ्याचे गणित!

झेंडूच्या फुलांना वर्षभर मागणी असते. तसेच त्यांना दरही चांगला मिळतो. ज्यामुळे झेंडू लागवड करणे शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर ठरत आहे. झेंडूच्या फुलाच्या लागवडीसाठी सकाळपासून संध्याकाळपर्यंत सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते. प्रखर सूर्यप्रकाश असलेल्या भागात झेंडूची शेती चांगली बहरते. महाराष्ट्रात झेंडूच्या शेतीसाठी पोषक वातावरण असल्याने, गेल्या दशभरात अनेक शेतकऱ्यांनी झेंडूच्या लागवडीतून आपली प्रगती साधली आहे. मुरमाड जमीन सर्वोत्तम : झेंडूच्या फुलांची लागवड सर्व प्रकारच्या जमिनीत करता येते. मात्र, झेंडू लागवडीसाठी वालुकामय, मुरमाड जमीन सर्वोत्तम मानली जाते. झेंडू लागवडीसाठी जमिनीचा पीएच ६.५ ते ७.५ इतका असावा लागतो. यासोबतच शेतात सावलीची जागा नसावी तसेच शेतात पाण्याचा निचरा होण्याची योग्य व्यवस्था असावी. झाडे लावण्यासाठी शेत तयार करताना, तण पूर्णपणे काढलेले असावे. मशागतीदरम्यान, कुजलेले खत आणि रासायनिक खते १५-२० सेमी खोलीपर्यंत जातील अशी मिसळावीत. झेंडूची रोपे बेडवर लावावीत. शेजारील दोन बेडमध्ये एक ते दीड फूट अंतर ठेवावे. शेतात हेक्टरी २००-२५० क्विंटल शेणखत टाकावे. याशिवाय २०० किलो नत्र आणि ८० किलो स्फुरद पिकांच्या वाढीदरम्यान द्यावे, ज्यामुळे फुलांचे उत्पादन वाढण्यास मदत होते.

हेक्टरी खर्च किती येतो? : झेंडूच्या फुलांच्या लागवडीतून शेतकऱ्यांना इतर पिकांच्या तुलनेत दुप्पट उत्पन्न मिळते. झेंडूच्या फुलांच्या लागवडीच्या खर्चाबाबत सांगायचे तर, एका हेक्टरमध्ये या फुलाची लागवड करण्यापासून ते बाजारात विक्री करण्यापर्यंत शेतकऱ्याला हेक्टरी एक लाख रुपये खर्च करावा लागतो. तर बाजारभावातील कमी-अधिक प्रमाण लक्षात घेता झेंडू पिकातून शेतकऱ्यांना कमीत-कमी दोन लाख रुपयांपर्यंत निव्वळ उत्पन्न सहज मिळतो. दर व्यवस्थित मिळाल्यास या उत्पन्नात मोठी वाढ देखील होऊ शकते.

विहीर दुरुस्तीसाठी १ लाख तर ठिबक संचासाठी ९७ हजारांपर्यंत मदत

शेतीला शाश्वत सिंचनाची जोड देऊन उत्पादन वाढविण्यासह शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारण्यासाठी राज्य शासनाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना महत्त्वपूर्ण ठरत आहेत. या योजनांच्या माध्यमातून पात्र शेतकऱ्यांना नवीन सिंचन विहीर खोदण्यासाठी चार लाख रुपयांपर्यंत, जुन्या विहिरीच्या दुरुस्तीसाठी एक लाख रुपये, ठिबक सिंचन संचासाठी ९७ हजार रुपये, तर विद्युत पंप संचासाठी ४० हजार रुपयांपर्यंत अनुदान मिळू शकते.

सिंचन सुविधांचा अभाव, पावसाची अनिश्चितता आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे अडचणीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठी या योजना दिलासादायक ठरू शकतात. शेतीतील उत्पादनवाढीसाठी पाण्याची उपलब्धता हा महत्त्वाचा घटक आहे. मात्र, अनेक शेतकऱ्यांकडे सिंचनाची पुरेशी सुविधा नसल्याने त्यांना पावसावर अवलंबून राहावे लागते. काही ठिकाणी जुन्या विहिरींची दुरुस्ती करणे, काही ठिकाणी ठिबक सिंचनासारख्या आधुनिक पद्धतींचा तर अवलंब करणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत शासनाच्या या योजनांमधून मिळणाऱ्या अनुदानामुळे सिंचन सुविधा विकसित करण्यासाठी आर्थिक मदत मिळू शकते.

नवीन विहिरीसाठी चार लाखांपर्यंत अनुदान :अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांतील शेतकऱ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, तर अनुसूचित जमातीतील



शेतकऱ्यांसाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना राबविण्यात येते. या योजनांमध्ये शेतीसाठी आवश्यक सिंचन सुविधा निर्माण करण्याच्या विविध घटकांचा समावेश आहे. नवीन सिंचन विहीर, जुन्या विहिरीची दुरुस्ती, ठिबक सिंचन संच आणि विद्युत पंप संच यांसाठी आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद आहे. नवीन विहीर उभारण्यासाठी चार लाख रुपयांपर्यंत, जुन्या विहिरीच्या दुरुस्तीसाठी एक लाख रुपये, ठिबक सिंचन संचासाठी ९७ हजार रुपये आणि विद्युत पंप संचासाठी ४० हजार रुपयांपर्यंत अनुदान मिळू शकते. मात्र, प्रत्यक्ष मंजूर होणारी रक्कम संबंधित घटकाच्या निकषांनुसार, लागू शासन निर्णयानुसार आणि उपलब्ध तरतुदीनुसार निश्चित केली जाते.

ठिबक सिंचनामुळे पाण्याची बचत :पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब महत्त्वाचा मानला जातो. या पद्धतीमुळे पिकांच्या मुळांजवळ नियंत्रित प्रमाणात पाणी देता येते. पाण्याचा अपव्यय कमी करण्यासह खतांचा कार्यक्षम वापर करणे शक्य होते. फळबागा, भाजीपाला आणि इतर योग्य पिकांसाठी ठिबक सिंचनाचा उपयोग होऊ शकतो. जुन्या विहिरींची दुरुस्ती झाल्यास उपलब्ध जलस्रोतांचा वापर अधिक प्रभावीपणे करता येऊ शकतो.

अर्जासाठी कागदपत्रांची पूर्तता आवश्यक :योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, आधारकार्ड, जमिनीचा सातबारा व आठ-अ उतारा, बँक खात्याचा तपशील आणि आवश्यकतेनुसार उत्पन्नाचा दाखला यांसारखी कागदपत्रे तयार ठेवावी लागतात. याशिवाय जमिनीची मालकी, संबंधित सिंचन घटकाची आवश्यकता, यापूर्वी घेतलेले अनुदान आणि योजनेच्या अन्य अटींचीही पडताळणी केली जाऊ शकते. अनुदानाची रक्कम आणि लाभ मिळण्याची प्रक्रिया शासनाच्या लागू नियमांनुसार निश्चित होत असल्याने अर्जदारांनी अधिकृत माहितीच्या आधारेच पुढील कार्यवाही करावी.

महाडीबीटी पोर्टलवर अर्जाची सुविधा :इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी शेतकरी पोर्टलवर उपलब्ध योजनांची माहिती तपासून ऑनलाइन अर्ज करावा. अर्ज करण्यापूर्वी संबंधित तालुका कृषी अधिकारी किंवा कृषी सहाय्यक यांच्याकडून पात्रता, कागदपत्रे आणि अनुदानाची अद्ययावत मर्यादा समजून घ्यावी. योजनेच्या अटींची पूर्तता करून कागदपत्रांसह अर्ज केल्यास पात्र शेतकऱ्यांना सिंचन सुविधासाठी आर्थिक मदत मिळणार आहे.

हळद साठवणूक प्रक्रिया

हळद काढल्यानंतर हळद शिजवणे, वाळवणे, पॉलिश करणे, आणि प्रतवारी करणे इत्यादी प्रक्रिया करावी लागते. हळद काढणीनंतर ४ ते ५ दिवसांमध्ये हळद शिजवण्याची प्रक्रिया करावी. हळद शिजवण्याअगोदर हळकुंडांची प्रतवारी करणे आवश्यक आहे. कारण सर्व हळकुंडांचा आकार एकसारखा नसून जाडी कमी अधिक असतो. जाड हळकुंडांना शिजवण्यास जास्त वेळ लागतो, तर लहान हळकुंडांना कमी वेळ लागतो. हळद शिजवल्याने बुरशी व इतर जीवजंतूंचा नाश होतो व हळकुंड रोगमुक्त राहतात.

हळद शिजवण्याची पद्धत : १) काहिलीत (कढईत) हळद शिजवणे : यामध्ये गुळ तयार करण्याच्या उथळ कढईचा वापर केला जातो. कढईत हळदीचे कंद भरल्यानंतर त्याला पाला, गोणपाट किंवा शेण-मातीचा थर लावून त्याचे तोंड बंद करावे. कढईच्या मध्यभागी हळदीच्या कंदांची उंच उभारणी करावी. व कढईच्या काठाखाली ४ ते ५ सेंमी पाणी भरावे. या शिजवण्याच्या प्रक्रियेला अडीच ते तीन तास लागतात. २) वाफेच्या सयंत्राचा वापर करून शिजवणे : या पद्धतीत वाफेच्या साह्याने हळद शिजवली जाते व या यंत्राला 'बॉयलर' असे म्हणतात. या यंत्राला चार लोखंडी ड्रम असतात व त्यात साधारणपणे २५० किलो हळद सामावली जाते. या सयंत्राच्या मध्यभागी पाण्याच्या दोन टाक्या असतात व पाणी उकळण्यासाठी दीड तास लागते. पाणी उकळल्यानंतर तयार झालेली वाफ पाईपद्वारे लोखंडी ड्रममध्ये सोडली जाते. हळद योग्य पद्धतीने शिजल्यानंतर लोखंडी ड्रमच्या खालील बाजूने असलेल्या नळातून पाणी पडायला सुरुवात होते. हे पाणी येऊ लागल्यास हळद शिजली असे समजावे.

हळद वाळविणे : शिजवलेली हळद १३ ते १५ दिवस उन्हात वाळवावी. पहिले तीन दिवस २ इंचापेक्षा जाड थर ठेवू नये. लोखंडी ड्रम मधून



शिजवलेली हळद २० ते ३० मिनिटांसाठी डिग करून ठेवावा व त्यानंतर ती हळद पसरवावी, त्यामुळे हळकुंडीची तूट होत नाही. हळद वाळू घालताना शेडनेट किंवा जुन्या साड्यांवर वाळवावी. हळद काळ्या मातीच्या जमिनीवर वाळवू नये. हळद वाळत घातल्यानंतर साधारण १ किंवा २ वेळा हळद उलट पालट करून घ्यावी. वेळोवेळी हळदी मधील बगल गड्डे, काडीकचरा, जेठेगड्डे बाहेर काढून टाकावे. पूर्णपणे वाळलेली किंवा अर्धवट वाळलेली हळद एकत्र करू नये. अधूनमधून उलट पलट करत असताना कमी शिजलेली किंवा जास्त फुगीर हळकुंडे त्वरित वेचून त्यांना बाजूला काढावेत.

हळद पॉलीश करणे : जातीनुसार हळदीची साल कमी जास्त जाडीचे असते व ही साल शिजल्यानंतर काळपट दिसते. अशा हळदीला पॉलीश केल्याशिवाय ती आकर्षित दिसत नाही व तिला बाचारात चांगला दर मिळत नाही. म्हणून पॉलीश करणे आवश्यक आहे. हळद पॉलिश करण्यासाठी लोखंडी ऑइलचा बॅरलचा वापर करावा. हळद भरण्यासाठी बॅरला ६ बाय ९ इंचाचे तोंड ठेवावे. या बॅरेलवर १० ते १५ सेमी अंतरावर ३ ते ६ सेमी लांब व १ ते १.५ सेमी रुंद छिद्रे पाडावीत. छिद्र पाडल्यामुळे पिंपाच्या आतील भाग खरबडीत होतो. पिपांला लोखंडी दांडा बसवून दोन्ही बाजुला हॅन्डलसारखा आकार द्यावा. दोन व्यक्ती मिळून पिंपाला गोलाकार फिरवावा. पिंपळामध्ये पॉलीश करण्याची हळद आणि घर्षणासाठी ५ ते ७ अनुकुचित दगड टाकून पिंपळाला फिरवल्यास हळद लवकरात लवकर पॉलीश होते. या पद्धतीस एक तासात २५ ते ३० किलो हळद पॉलिश होते.

हळद कंद काढणीनंतर व्यवस्थापन : हळद काढताना साधारण आठ ते नऊ महिने पूर्ण झालेले कंद काढावेत. हळद काढणी झाल्यानंतर बियाण्यांसाठीचे कंद लगेच सावलीत ठेवावे. बेणे साठवण्यासाठी हळदीचा पाला, गव्हाचा काड, वाळलेले गवत याचा वापर करावा. हे सर्व घटक क्लिनॉलफॉस २ मिलि आधिक कार्बेंडाझिम १ ग्रॅम प्रतिलिटर पाणी हे द्रावणाने फवारून निर्जंतुक करून घ्यावे. निर्जंतुकीकरणानंतर हे घटक उन्हामध्ये चांगले वाळवून घ्यावेत.

हळद साठवणूक कशी करावी : हळद अधिक काळ टिकवण्यासाठी पिकाचे योग्यवेळी काढणी करावी. हळदीचे योग्य पद्धतीने साठवणूक करणे देखील महत्त्वाचे आहे, अन्यथा कंदांना कीड रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो व ते लवकर खराब होतात. १. जमिनीवर बियाणे साठवणे - बियाण्याची सुप्त अवस्था साठवण्यासाठी २.५ महिने बेणे साठवावे लागतात. निर्जंतुक केलेल्या पाल्याची ७ ते ८ इंच जाडीची गादी तयार करावी. त्या पाल्यावर सावली ठेवलेले बेणे टाकावे. एक फूट उंचीचा थर झाला की त्यावर कार्बन्डाझिम पावडर १ किलो या प्रमाणात टाकावे. अशाच प्रकारे तीन फूट उंचीचा ढीग करावा. वरतून ६ ते ८ इंचाचा पाल्याचा थर टाकावा. त्यानंतर दोन दिवसांनी गोणपाट ओले करून टाकावे. गोणपाट टाकताना ढिगांमध्ये थंडावा राहिला पाहिजे अशा पद्धतीने तो टाकावा. २. जमिनीत खड्डा (पेव) करून बियाणे साठवणे - बियाणे साठवण्यासाठी ३ ते ३.५ फूट खोलीचा लांब रुंदीचा खड्डा खोदावा. खड्ड्याच्या तळाला उतारा द्यावा व खड्ड्याच्या तळाशी ३ ते ४ इंच जाडीचा विटांच्या तुकड्याचा थर टाकावा. त्यावर कार्बेन्डाझिम पावडर १ किलो टाकावी. यानंतर त्याच्यावर निर्जंतुक पाल्याचा अर्धा फूट जाडीचा थर टाकावा व खड्ड्याच्या आजूबाजूलाही पाल्याचा थर टाकावा. खड्डा ३ फूट इतका उंचीचा भरून घ्यावा व त्यानंतर त्याच्यावर निर्जंतुक केलेला पाला अंतरावा. तसेच खड्ड्यामध्ये एक मीटर अंतरावर छिद्र पाडून पोकळ बांबू किंवा २.५ ते ३ इंच व्यासाचे छिद्रे पाडून त्यात पी.व्ही.सी पाईप टाकावे. त्यानंतर लाकडी फळीने किंवा गोणपाटाने खड्डा झाकून घ्यावा. पाऊस आल्यास तेवढ्यापुरती तो खड्डा प्लास्टिक कागदाने झाकून घ्यावा.

बाजीराव दादा चव्हाण यांच्या सेवाकार्याचा माणुसकीचा ठसा

परभणीच्या रुग्णावर बीडमध्ये मोफत उपचार! : आर्थिक संकटात सापडलेल्या रुग्णासाठी मदतीचा हात; बाजीराव चव्हाण ठरले आधार

बीड । प्रतिनिधी

आर्थिक परिस्थिती हलाखीची असली, तरी उपचाराअभावी कोणत्याही रुग्णाला वेदना सहन कराव्या लागू नयेत, या भावनेतून युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णसेवेचे कार्य सातत्याने सुरू आहे. याच सेवाभावी कार्याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला असून, परभणी जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णाच्या खुब्याच्या हाडावरील शस्त्रक्रिया बीड येथे योजनेअंतर्गत मोफत करण्यात आली.

या कामी रुग्णसेवक शरद झोडगे आणि हनुमान खेत्रे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. परभणी येथील सलारबी अफसरखा पठाण यांच्या खुब्याच्या हाडाला फ्रॅक्चर झाले होते. संबंधित डॉक्टरांनी त्यांना शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला होता. मात्र, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने शस्त्रक्रियेचा खर्च कसा करायचा, असा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला होता.



रुग्णाचे सहकारी मित्र हनुमान खेत्रे यांनी या परिस्थितीची माहिती रुग्णसेवक शरद झोडगे यांना दिली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शरद झोडगे यांनी तातडीने रुग्णाचा एक्स-रे मागवून घेतला. त्यानंतर त्यांना बीड येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी बोलावण्यात आले. संबंधित डॉक्टरांशी चर्चा करून शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या योजनेच्या प्रक्रियेचा पाठपुरावा करण्यात आला. प्रयत्नांना यश आले आणि रुग्णाच्या खुब्याच्या हाडावरील शस्त्रक्रिया योजनेअंतर्गत मोफत करण्यात आली. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचारांबाबत चिंतेत असलेल्या रुग्णाला मोठा दिलासा मिळाला.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे साहेब, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब आणि शिवसेना वैद्यकीय मदत कक्षप्रमुख मंगेशजी चिवटे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने गरजू रुग्णांना उपचार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

केवळ बीड जिल्हाच नव्हे, तर इतर जिल्ह्यांतील गरजू रुग्णांनाही आवश्यक उपचार मिळावेत, यासाठी आरोग्यसेवेच्या माध्यमातून मदतीचा हात पुढे केला जात आहे. आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून कोणीही वंचित राहू नये, हा या सेवाकार्यामागील मुख्य उद्देश आहे.

संभाजीनगरात भररस्त्यात तरुणाचा निर्घृण खून

व्यावसायिक वादातून मित्रानेच काढला काटा

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर शहरातील एन-७ सिडको परिसरात भररस्त्यात घडलेल्या हत्येचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. व्यावसायिक स्पर्धेतून आणि अंतर्गत वैमनस्यातून एका २२ वर्षीय तरुणाने आपल्याच जवळच्या मित्राचा अत्यंत निर्घृणपणे काटा काढला आहे. आधी पाठीमागून भरधाव कारने जोरदार धडक दिली आणि त्यानंतर यू-टर्न घेत जखमी अवस्थेत तडफडणाऱ्या मित्राच्या डोक्यात लोखंडी रॉड आणि लाकडी दांड्याने सपासप वार करून त्याची जागीच हत्या केली. देवेश उर्फ बंटी चंद्रेश दीक्षित (वय ३६) असे मयत तरुणाचे नाव असून, पवन दिलीप पराशर (वय २२, रा. वानखेडेनगर) असे आरोपीचे नाव आहे. या थरारक हत्येनंतर आरोपी पवन स्वतः कार घेऊन सिडको पोलीस ठाण्यात हजर झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत देवेश उर्फ बंटी दीक्षित आणि आरोपी पवन पराशर यांच्यात गेल्या अनेक दिवसांपासून व्यावसायिक आणि पैशाच्या कारणावरून वाद धुमसत होता. घटनेच्या दिवशी सकाळी बंटी नेहमीप्रमाणे जिम आटोपून आपल्या दुचाकीवरून घरी जात होता. आरोपी पवन हा आधीपासूनच कारमध्ये दबा धरून त्याच्या हालचालींवर पाळत ठेवून होता. बंटीची दुचाकी एन-७ सिडकोतील मंगेश गॅस एजन्सीसमोर पोहोचताच, पाठीमागून येणाऱ्या आरोपी पवनने कारचा वेग वाढवला आणि दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, बंटी हवेत उडून थेट रस्त्यावर कोसळला, तर त्याची दुचाकी तब्बल १५० फूट दूर असलेल्या विश्वास वाईन्स शॉपजवळ जाऊन आदळली. कारच्या धडकेने बंटी गंभीर जखमी अवस्थेत रस्त्यावर पडला होता. मात्र, आरोपीने गाडी न थांबवता पुढे जाऊन चौकातून अचानक यू-टर्न घेतला आणि कार पुन्हा जखमी बंटीच्या अंगाजवळ आणून थांबवली. कारमधून खाली उतरताना आरोपीने लाकडी दांडा आणि जाड लोखंडी रॉड काढला. रक्तबंबाळ अवस्थेत पडलेल्या बंटीच्या डोक्यात आणि चेहऱ्यावर त्याने अत्यंत क्रूरपणे एकापाठोपाठ एक घाव घातले. डोक्यात वर्मी घाव बसल्याने बंटी दीक्षितचा जागीच मृत्यू झाला. भररस्त्यात हा थरार घडवून आणल्यानंतर, हल्लेखोर पवन पराशरने घटनास्थळावरून पळ काढला. मात्र, तो थेट कार घेऊन सिडको पोलीस ठाण्यात पोहोचला आणि पोलिसांसमोर स्वतःहून हजर झाला. भरदिवसा घडलेल्या या निर्घृण हत्याकांडामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, सिडको परिसरात प्रचंड दहशत पसरली आहे. या भयंकर खुनाने छत्रपती संभाजीनगर परिसरात भीतीचे वातावरण आहे. खुनाची माहिती मिळतातच पोलीस उपायुक्त रत्नाकर नवले, पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर आणि अतुल येरमे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी या खुनाचा तपास सुरू केला आहे. चौकशीअंती खुनाचे नेमके कारण आणि मुख्य सूत्रधारही समोर येईल.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे राष्ट्रासाठीचे योगदान आजही मार्गदर्शक-रावसाहेब दानवे

जनसंघाच्या विचारधारेच्या बळावर भाजपाने देशभरात संघटन मजबूत केले- आ.बबनराव लोणीकर

जालना। प्रतिनिधी

भारतीय जनसंघाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भारतीय जनता पार्टी, जालना महानगरच्या वतीने जालना शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. वीर सावरकर चौक येथून फुलंब्रीकर नाट्य गृहापर्यंत काढण्यात आलेली ही रॅली मोठ्या उत्साहात संपन्न झाली रॅलीच्या समारोपानंतर डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ''एक देश में दो प्रधान, दो निशान और दो विधान नहीं चलेंगे'' या त्यांच्या ऐतिहासिक घोषणेचे स्मरण करून त्यांच्या राष्ट्रनिष्ठ विचारांना उजाळा देण्यात आला.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यानाची जागा मागील अनेक वर्षांपासून वादात अडकली होती. अखेर ही जागा जालना शहर महानगरपालिकेच्या ताब्यात आल्याने उद्यानाच्या उर्वरित रखडलेल्या विकासकामांचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे या परिसराचा विकास होण्यास गती मिळणार असून, नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री तथा आ. बबनरावजी लोणीकर, प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, आ. नारायण कुचे, माजी आ.कैलास गोरंट्याल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष



भास्कर आबा दानवे, राहुल भैया लोणीकर, मराठवाडा संयोजक नितीन काळे, किरण पाटील, भाजप मराठवाडा कार्यालय प्रमुख धनंजय कुलकर्णी, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, रामेश्वर भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, भाजपा सरचिटणीस सुनील पवार, संगीताताई गोरंट्याल यांच्यासह भाजपा नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी देशाच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान आणि जनसंघाच्या माध्यमातून मांडलेले विचार आजही मार्गदर्शक आहेत. त्याच विचारांच्या आधारावर भारतीय जनता पार्टीने देशभरात संघटन उभे केले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या प्रगतीसाठी काम सुरू आहे.

यावेळी माजी मंत्री आ. बबनरावजी लोणीकर म्हणाले की, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी रुजवलेल्या विचारधारेच्या बळावर भारतीय जनता पार्टीने देशभरात संघटन मजबूत केले आहे. भारतीय जनसंघाचा ७५ वर्षांचा हा प्रवास प्रत्येक कार्यकर्त्यासाठी अभिमानाची बाब आहे

प्रदेश सरचिटणीस सुनील राणे म्हणाले की, भविष्यात जेव्हा डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा जालन्यातील त्यांच्या स्मारकाचा उल्लेख आवर्जून केला जाईल. जालन्यातील हे स्मारक त्यांच्या विचारांची आणि राष्ट्रासाठी दिलेल्या योगदानाची आठवण करून देणारे ठरेल. यावेळी नगरसेवक वीरेंद्र धोका यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तसेच डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यानाची जागा जालना महानगरपालिकेच्या ताब्यात मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे उद्यानाच्या विकासकामांना मार्ग मोकळा झाल्याने उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

मराठा समाजात फूट पाडण्याचं मोठं षडयंत्र!

मनोज जरांगेंच्या ऑडिओ क्लिपनंतर अर्जुन खोतकरांचा आरोप, उच्चस्तरीय चौकशीची मागणी

जालना। प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषदेत ऐकवलेल्या ऑडिओ क्लिपनंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या ऑडिओ क्लिपवर शिवसेनेचे नेते अर्जुन खोतकर यांनी गंभीर आरोप केले आहेत. ''मराठा समाजामध्ये फूट पाडण्याचे हे एक मोठे षड्यंत्र असून, या ऑडिओ क्लिपची उच्च पातळीवर आणि फॉरेन्सिक लॅबमार्फत चौकशी होणे गरजेचे आहे, अशी मागणी खोतकर यांनी केली आहे. या प्रकरणावर बोलताना अर्जुन खोतकर म्हणाले की, ''मला यामध्ये मराठा समाजामध्ये फूट पाडण्याचे एक मोठे षड्यंत्र दिसत आहे. या षड्यंत्रामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघणार आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या मुळाशी जाणे अत्यंत आवश्यक आहे.''



ऑडिओ क्लिपच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत खोतकर यांनी तंत्रज्ञानाच्या दुरुपयोगाची शक्यता वर्तवली. ते म्हणाले, ''या सर्व क्लिप फॉरेन्सिक लॅबने तपासल्या पाहिजेत. ही कॉन्फरन्स मीटिंग आहे की गुगल मीटिंग, यामध्ये कोण-कोण सहभागी होते, हे शोधून काढले पाहिजे. 'एआय' () तंत्रज्ञानाचा वापर करून मधेच काही आवाज टाकले आहेत का, हे सर्व तपासून बघितले पाहिजे. ऑडिओ क्लिपमध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांचे नाव घेणाऱ्या महिलेवर खोतकर यांनी विशेष आक्षेप घेतला आहे. ''जी महिला यामध्ये माननीय श्रीकांत शिंदे साहेबांचे नाव घेते, त्या महिलेची कसून चौकशी झाली पाहिजे. ती कोणत्या पक्षाशी किंवा कोणाशी निगडित आहे, हे समोर आले पाहिजे. कारण, ती महिला बोलत असताना समोरून कोणीही उत्तर दिलेले नाही, त्यामुळे या क्लिपमध्ये फेरफार केल्याचा संशय येतो,'' असे खोतकर यांनी स्पष्ट केले. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या ऑडिओ क्लिपवर स्पष्टीकरण देताना बन म्हणाले, ''सध्या बाजारात 'एआय'चा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. अमिताभ बच्चन, राजेश खन्ना, राज कपूर यांचे आवाज काढून लोकांना फसवण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे जरांगे पाटलांनी दाखवलेली क्लिप 'एआय' जनरेटेड किंवा फॅब्रिकेटेड असू शकते. या क्लिपमधील संभाषणाचे संदर्भ हे विधानसभा निवडणुकीपूर्वीचे वाटत आहेत. त्यामुळे या प्रकरणाचे 'दूध का दूध आणि पाणी का पाणी' होणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यात लक्ष घालून, गरज पडल्यास स्पेशल एसआयटी किंवा टास्क फोर्स नेमून या ऑडिओ क्लिपची सत्यता जनतेसमोर आणावी, अशी भारतीय जनता पार्टीची भूमिका आहे. स्वतः जरांगे पाटलांनीही चौकशीची मागणी केली आहे.

उमरग्यात रोटरी व पंचायत समितीच्या वक्तृत्व स्पर्धेत प्रीती बिराजदार प्रथम

उमरगा । प्रतिनिधी

रोटरी क्लब उमरगा व पंचायत समिती गटशिक्षण कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत भारत विद्यालयाची विद्यार्थिनी प्रीती बिराजदार हिने प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. या यशामुळे प्रशालेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व कला विकसित व्हावी, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा, विचार मांडण्याची क्षमता वाढावी तसेच व्यासपीठावर प्रभावीपणे बोलण्याचे कौशल्य आत्मसात व्हावे या उद्देशाने विविध स्तरांवर वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धांतून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. या स्पर्धेत प्रीती हिने आपल्या वक्तृत्व कौशल्याच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळवत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली.

प्रीती हिच्या या उज्ज्वल यशाबद्दल मुख्याध्यापक संजय देशमुख, उपमुख्याध्यापक विक्रांत मोरे यांच्या हस्ते प्रीती बिराजदार व सहशिक्षक दुधाराम शिरसागर यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी शिक्षकांनीही प्रीतीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रीती बिराजदार हिने मिळवलेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, या यशाबद्दल प्रशालेत आनंदाचे वातावरण आहे. तिच्या या पुढील शैक्षणिक व स्पर्धात्मक वाटचालीसाठी सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. योग्य सराव, मेहनत अन्? मार्गदर्शनाचे फलित प्रीतीला मार्गदर्शक सहशिक्षक दुधाराम शिरसागर यांचे मार्गदर्शन लाभले. योग्य सराव, मार्गदर्शन आणि मेहनतीच्या जोरावर प्रीतीने हे यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांना विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. प्रीती हिच्या यशातून विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या एकत्रित प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

जाहिर प्रगटन

मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १५५१/२०२६

(मार्फत विधिज्ञः अॅड सी.बी. जाधव)

अर्जदार :- १. वामन पि. विश्वनाथ थोरात, वय ६९ वर्षे, धंदा मजुरी, २. केशव पि. विश्वनाथ थोरात, मयत २-१ शिवाजी पि. केशव थोरात, वय ६५ वर्षे, धंदा मजुरी, २-२ बंडु पि. केशव थोरात, वय ५३ वर्षे, धंदा मजुरी, सर्व रा.नेकनुर, ता.जि.बीड

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी मयत नामे विश्वनाथ पि. पंढरीनाथ थोरात हे दिनांक ०४/०५/१९८२ रोजी मौजे आंनदवाडी ता. जि. बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र. २-१ व २-२ हे मयताचे नातु आहेत. मयतास मुलगी नाही तसेच मयताची पत्नी यापूर्वीच मयत झालेले आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. आज दिनांक:- ३०/०९/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. पुढील तारीख:-२४.११.२०२६.

आदेशावरुन,
स्वाक्षरीत / -
अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

जा.क्र. २९९३/२६-२१/१०/२०२६

मा. श्री. मिथून अ. शिंदे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पाटोदा यांच्या न्यायालयात

फौजदारी किरकोळ अर्ज/१७५/२०२६

सुनिल वि. ग्रामसेवक

अर्जदार :- सुनिल भाउराव जाधव, वय :- ५२ वर्षे रा. जवळाला ता. पाटोदा जि. बीड. विधिज्ञ :-श्री.टी.डी. जाधव विरुद्ध

गैरअर्जदार :- ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जवळाला ता. पाटोदा जि. बीड. मागणी अर्ज :- रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्ट १९६९ अन्वये जन्माची नोट घेण्याबाबत. ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदाराच्या मुलाचा नामे मयुर सुनिल जाधव यांच्या जन्माची नोंद गावातील ग्रामपंचायत कार्यालय येथे घेणे बाबत अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराच्या मुलाचा जन्म दिनांक २४/०४/२००२ रोजी जवळाला ता. पाटोदा जि. बीड या ठिकाणी झालेला आहे.

त्याअर्थी ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामसेवक यांना सूचित करण्यात येते की त्यांचे या अर्जावर काय म्हणणे आहे ते ग्रामसेवक यांनी ३०/११/२०२६ रोजी आपले म्हणणे या न्यायालयासमोर सादर करावे. यामध्ये जाहीर प्रगटनाव्दारे सर्वांना कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांच्या मुलाचा नामे मयुर सुनिल जाधव नोंद घेण्यास कोणास काही अक्षेप असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द दिनांक पासुन पुढील एक महीन्याच्या आत या न्यायालयात हजर होउन लेखी हरकती/ आक्षेप आपण स्वतः अथवा आपण नियुक्ती केलेल्या विधिज्ञांमार्फत कळविण्यात यावे. सदरह् मुदती मध्ये कोणीही आक्षेप नोंदविला नाही तर या न्यायालयामध्ये उपरोक्त अर्जदार यांच्या मुलाचा जन्माची नोंद घेणे कामी अर्जाचे पुरावे घेउन योग्य तो आदेश करण्यात येईल

दिले. आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदर प्रकरणाची पुढील तारीख ३०/११/२०२६ आहे.

आदेशावरुन,
स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक,
फौजदारी न्यायालय, पाटोदा

१४ कोटी थकल्याने सफाई मजूर संपावर, सर्वत्र दुर्गंधीचे साम्राज्य, प्रशासन मात्र ढिम्म

धाराशिव। प्रतिनिधी

स्वच्छता मजुरांचे दोन महिन्यांपासून वेतन झाले नसल्याने शहरातील २५० मजुरांनी गत ३ दिवसांपासून कचरा संकलनाचे काम बंद केले आहे. त्यामुळे शहरातील प्रमुख बाजारपेठेसह समता नगर, रामनगर, बार्शी रोड, वैराग रोड, रसूलपुरा, खाजा नगरसह प्रमुख बाजारपेठेतील विविध अंतर्गत रस्त्यांवर कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत.

धाराशिव शहरात कचरा संकलनाचे कंत्राट दिलेल्या ठेकेदाराचे धाराशिव नगर परिषदेतर्फे गत २० ते २२ महिन्यापासूनचे जवळपास १३ ते १४ कोटी रुपये थकीत असल्याची माहिती आहे. धाराशिव शहरातील कचरा संकलनासाठी महिन्याकाठी ६० ते ६५ लाखांची रक्कम खर्च होते. पालिकेने वेळेत पैसे न दिल्याने कंत्राटदारांच्या कर्मचाऱ्यांनी आमचे वेतन होईपर्यंत आम्ही कचरा उचलणार नाही, अशी आक्रमक भूमिका घेतली आहे. वेतन मिळाल्याशिवाय कचरा उचल करणार नाही, अशी भूमिका स्वच्छता मजुरांनी घेतल्याने ३ दिवसांपासून कचरा संकलनाचे काम ठप्प झाले आहे. परिणामी शहरातील समता नगर, रसूलपुरा, फकीरा नगर, वैराग रोड, उंबरे कोटा, समर्थ नगर, बस स्थानक परिसर, तुळजापूर रोडवरही रस्त्यालगत कचरा पसरला आहे. नगरपरिषदेची घंटागाडी वेळेवर येत नाही. आठ दिवसांतून



एकदा येते. जाधववाडी रोड श्री श्री रविशंकर विद्यालयाच्या पाठीमागे दलित वस्तीत नागरी सुविधांचा अभाव आहे. येथील रस्ते खराब असून नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. पिण्याचे पाणी येत नसल्याने पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागते. प्रज्ञा बनसोडे, महिला नागरिक शहरात कचरा, पाणी, रस्त्यांचे प्रश्न गंभीर बनले आहेत. तरी कुणी बोलायला तयार नाही. नगरपरिषद कर घेते मग सुविधा का देत नाही. म्हणूनच प्रशासकापेक्षा प्रशासनच बरं होतं म्हणण्याची वेळ आली आहे. तुम्ही सुविधा देऊ शकत नसाल तर किमान २ वर्ष तरी कर घेऊ नका. कचऱ्याचे टेंडर जसे निघाले तसे कामही होत नाही. कंत्राटदाराचे पैसेही थकले मग हातावरच पोट असलेल्या त्या कर्मचाऱ्यांनी काय करायचं?'' नाना घाटगे, नगरसेवक, धाराशिव मी सध्या मीटिंगमध्ये आहे. थोड्या वेळाने फोन करून मी तुम्हाला माहिती देते. तुम्ही स्वच्छता निरीक्षकांशी बोलून घ्या. नीता अंधारे, मुख्याधिकारी, धाराशिव नगरपरिषद

महिन्याला ६५ लाखांचा खर्च, तरी रस्त्यांवर ढिगारे धाराशिव शहरात कचरा संकलनासाठी जवळपास ६० ते ६५ लाख रुपयांचा खर्च होतो. परंतु एवढा खर्च करूनही वेळेवर पैसे न दिल्याने सर्वाधिक वर्दळीच्या तुळजापूर रोडवर आठवडी बाजार परिसर, शासकीय आयटीआयच्या अलीकडे रस्त्यालगत, जाधववाडी रोड रविशंकर शाळे पाठीमागे, वैराग रोडवरील फकीरा चौक, भीमनगर मार्ग रसूलपुरा रस्त्यावर, कपिलधारा स्मशानभूमी रस्त्यावर, बार्शी रोड हनुमान चौकाच्या पुढे, समतानगर बांधकाम विभागाकडील रस्त्यावर,शाहू नगरसह, प्रमुख बाजारपेठेसह अन्य अंतर्गत भागात कचऱ्याचे ढीग साचले आहेत.

दैनिक
राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर २०२६ | ६

पाणीटंचाईच्या झळा रोखण्यासाठी आतापासूनच सज्ज व्हा जिल्हाधिकारी यांचे प्रशासनाला सूक्ष्म नियोजनाचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

यंदा जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत मोठी घट झाली आहे. आगामी उन्हाळ्यात बीडकरांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला सामोरे जावे लागू नये, यासाठी प्रशासनाने आतापासूनच टप्प्याटप्प्याने कृती आराखडा राबवावा, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहेत. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तांत्रिक दृष्ट्या सूक्ष्म नियोजन आणि लोकसहभागातून भूजल व्यवस्थापनावर भर देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. केंद्रीय भूमी जल बोर्ड (पुणे) आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (त्रह्मऊ-) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासनाला उपाययोजनांचे काटेकोर नियोजन करण्याचे आदेश दिले. ऑक्टोबर ते डिसेंबर या पहिल्या टप्प्यामध्ये बोअरवेल आणि हातपंपांची विशेष दुरुस्ती मोहीम राबवण्यात



यावी, तसेच जानेवारी ते जून या तीव्र टंचाईच्या काळासाठी यंत्रणांनी आतापासूनच सज्ज राहावे, असे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय पाणीटंचाईच्या दृष्टीने संवेदनशील असलेली गावे आणि वाड्या-वस्त्यांचा तांत्रिक अहवाल तयार करणे, गरजेनुसार खाजगी विहिरींचे वेळेवर अधिग्रहण करणे, आवश्यक त्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करणे आणि बंद असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांची तात्काळ दुरुस्ती करण्याच्या तातडीच्या सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे आणि दूषित पाण्यामुळे आरोग्याचे कोणतेही प्रश्न निर्माण होऊ नयेत, यासाठी पाण्याची नियमित गुणवत्ता तपासणी (थरींशी टींरश्रळीं ढ्शींळपस) करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी गावाचा पाण्याचा ताळेबंद (थरींशी ईंवसशींळपस) मांडणे अत्यंत गरजेचे असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. गावात उपलब्ध असलेले जमा पाणी आणि पिण्यासाठी व शेतीसाठी लागणारे पाणी याचा हिशोब करून लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन करावे लागणार आहे. तसेच, पिण्याचे पाणी राखीव ठेवून रब्बी हंगामात पीक पद्धतीत बदल करणे काळाची गरज आहे. जास्त पाणी लागणाऱ्या गहू व कांद्यासारख्या पिकांऐवजी हरभरा, मूग, वाटाणा आणि बाजरी यांसारख्या कमी पाण्यात येणाऱ्या व चांगले आर्थिक उत्पन्न देणाऱ्या पिकांवर शेतकऱ्यांनी भर द्यावा. यासाठी ग्रामसभेच्या माध्यमातून गावागावांत व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

महसूल, जिल्हा परिषद, कृषी विभाग आणि भूजल यंत्रणेने परस्पर समन्वयाने काम करून संभाव्य पाणीटंचाईवर मात करावी आणि शेतकऱ्यांचे हित जपावे, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी व्यक्त केली. या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीत केंद्रीय भूजल विभागाच्या शास्त्रज्ञ व्ही. हेमलता आणि शुभांशू तिवारी यांनी सविस्तर सादरीकरण केले. यावेळी स्थानिक प्रशासनातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. पाण्याचा प्रत्येक थेंब मोलाचा असल्याने नागरिकांनीही पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

माजलगावच्या जय महेश साखर कारखान्यात विजेचा धक्का; २७ वर्षीय कामगाराचा मृत्यू

माजलगाव । प्रतिनिधी

येथील जय महेश साखर कारखान्यात विजेचा धक्का लागून २७ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि २१ ऑक्टोबर बुधवार रोजी सायंकाळी ५:०० वाजण्याच्या सुमारास घडली आहे. लखन बादाडे असे मृत कामगाराचे नाव आहे. या घटनेमुळे कारखाना परिसरात खळबळ उडाली असून,तरुण कामगाराच्या मृत्यूने हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, जय महेश साखर



लखन बादाडे यांचा दुर्दैवी अंत; नातेवाईकांनी मृतदेह कारखान्यात नेल्याने परिसरात खळबळ

कारखान्यात दि २१ ऑक्टोबर बुधवार रोजी सायंकाळी ५:०० वाजण्याच्या सुमारास काम करत असताना लखन बादाडे यांना विजेचा धक्का लागला. या दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला.त्यानंतर लखन बादाडे यास माजलगाव शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले मात्र खासगी रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.मात्र ही घटना नेमकी कशी घडली, याबाबत सविस्तर माहिती अद्याप समोर आलेली नाही.

घटनेची माहिती मिळताच मृताच्या नातेवाईकांनी सायंकाळी ८:०० वाजता लखन बादाडे याचा मृत्यदेह माजलगाव शहरातील खाजगी रुग्णालयातुन जयमहेश कारखाना परिसरात धाव घेतली.त्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह कारखान्यात नेला.या प्रकारामुळे कारखाना परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाल्याची माहिती आहे.

कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

कारखान्यात ◂◂ पान ३ वर

माजलगाव-तेलगाव रस्त्यासाठी आता आरपारची लढाई; मोहन जगताप यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाचा इशारा

नितीन गडकरी यांना निवेदन दिल्यानंतर थातुरमातुर काम; २६ ऑक्टोबरला पात्रुड येथे रास्ता रोको

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव-तेलगाव रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. रस्त्यावरील मोठमोठ्या भेगा, कामाच्या दर्जाबाबत निर्माण झालेले प्रश्न आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे वाहनचालक व प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या प्रश्नावर मोहनराव (मोहनदादा) जगताप यांनी यापूर्वीच केंद्रीय रस्ते वाहतूक व



महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन देऊन लक्ष वेधले होते. या निवेदनानंतर रस्त्याचे थातुरमातुर काम करण्यात आले; मात्र रस्त्याचा मूलभूत प्रश्न अद्याप कायम असल्याने आता नाईलाजास्तव आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आज तहसील कार्यालय, माजलगाव येथे निवेदन देण्यात आले. सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी पात्रुड येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे या निवेदनाद्वारे स्पष्ट करण्यात आले.

माजलगाव-तेलगाव रस्त्यावरील मोठमोठ्या भेगा आणि ◂◂ पान ३ वर

संभाजीनगरची चोरीची बुलेट पेट्रोलिंगदरम्यान बीडमध्ये पकडली

फौजदार विजय जाधवर यांच्या कारवाईचा दणका

बीड । प्रतिनिधी

जिल्हा वाहतूक शाखेकडून जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात वाहतूक नियंत्रणासह कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रयत्न चालू आहेत याच दरम्यान वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील व पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली बस स्थानक परिसरात काल दि.२१ आक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता उडपी हॉटेलसमोर पेट्रोलिंग करत असतांना जिल्हा वाहतूक शाखेच्या पथकाने ६१ या तोतया क्रमांकाची बुलेट फौजदार विजय जाधवर व सोबत असलेले अंमलदार यांच्या नजरेत आल्यावर त्यांना वाहन संशयास्पद वाटल्याने गाडीचालकाची चौकशी करुन बुलेट पकडली. त्यावेळी वाहनचालक आरोपी रोहीत हरिभाऊ डोंगरे रा.सावरगाव ता.गेवराई जि.बीड याची बोलतांना त्रेधातिरपट उडाल्याने पोलीसांना संशय आला व त्यांनी गाडी ताब्यात घेवून तिचा इंजिन क्रमांक तसेच चेसीस क्रमांक तपासला असता सदर वाहन हे शुभम जाधव, रा.छत्रपती संभाजीनगर यांचे असून पोलीस स्टेशन सिडको छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच सदरील वाहनाचा खरा क्रमांक हा एम.एच.२० ईएच ८१११ अशी असल्याची पोलीस खात्याच्या नाकाबंदी ॲपवरुन समोर आली आहे. ही कारवाई करतांना पोलीस हवालदार त्रिंबक कुडके व पोलीस अंमलदार ◂◂ पान ३ वर



मराठवाडा पदवीधर मतदारसंघासाठी बीड तालुक्यात मतदान पथकांची केंद्रांवर रवानगी

३७ मतदान केंद्रांवर १५ हजार २४२ पदवीधर मतदारांसाठी आज होणार मतदान प्रक्रिया

बीड । प्रतिनिधी

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी बीड तालुक्यातील ३७ मतदान केंद्रांवर एकूण १५ हजार २४२ पदवीधर मतदारांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे . या निवडणुकीच्या अनुषंगाने आज , दि . २२ ऑक्टोबर २०२६ रोजी तालुक्यातील सर्व मतदान केंद्रांवर नियुक्त करण्यात आलेल्या मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकांना आवश्यक निवडणूक साहित्य ◂◂ पान ३ वर



पाणीप्रश्न सोडविण्यासाठी शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

बदामराव पंडित यांचे मुख्यमंत्री फडणवीस व जलसंपदामंत्री विखे पाटील यांना निवेदन

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना करून गोदावरी-अमृता-सिंदफणा नदीवरील जलसाठे, बंधारे व उपकालव्यांची प्रलंबित कामे पूर्ण करावीत, तसेच पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी जायकवाडी धरणात वळवून जिल्ह्याला हक्काचे पाणी उपलब्ध करून द्यावे, या मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. यासंदर्भात शेतकऱ्यांनी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

श्री क्षेत्र भगवानगड ते तालखेड (माजलगाव) तसेच गोदावरी ते सिंदफणा नदी परिसरातील जलसाठे व बंधाऱ्यांची कामे पूर्ण करावीत. सिंदफणा नदीवरील



टाकळगंगा, निमगाव, येळंब बंधाऱ्याचे तसेच नाथापूर, कुक्कडगाव, इटकूर, साक्षाळपिंपरी व क. धानोरा परिसरातील बंधाऱ्यांची कामे गतीने पूर्ण करावीत. गेवराईतून जाणारा उजवा कालवा आणि माजलगाव धरणासाठी पाण्याचे योग्य नियोजन करून मंजूर पाणी वाटपाच्या तरतुदींची अंमलबजावणी करावी, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

या मागण्यांबाबत माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना स्वतंत्र निवेदने देऊन सकारात्मक निर्णय घेण्याची व संबंधित कामांवर तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

तसेच या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी लोकप्रतिनिधी, जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि शेतकरी प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक आयोजित करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. शासनाने या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, अशी भूमिका शेतकऱ्यांनी मांडली आहे.

शिक्षकाच्या त्रासाला कंटाळून १३ वर्षीय विद्यार्थ्याची आत्महत्या!

» वडिलांच्या फिर्यादीवरुन शिक्षकावर गुन्हा

गेवराई । प्रतिनिधी

वसतीगृहातील शिक्षकाकडून वारंवार त्रास दिला जात असल्यामुळे एका १३ वर्षीय विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी विद्यार्थ्याच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात शिक्षकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समर्थ आबासाहेब खरात (वय १३, रा.कवडगाव, ता. गेवराई) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. प्रतापकाका ढाकणे यांच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील हिंद वसतिगृहात तो राहत होता. समर्थ सातवीत, तर त्याचा भाऊ साई हा इयत्ता पाचवीत शिक्षण घेत होता. या वसतिगृहात कार्यरत असलेले शिक्षक सुभाष घुगे हे मागील काही दिवसांपासून समर्थला वारंवार विनाकारण त्रास देत असल्याचे त्याने वडिलांना सांगितले होते. दरम्यान, सततच्या त्रासाला कंटाळून समर्थने बुधवार, २१ ऑक्टोबर रोजी दुपारी वसतिगृहातच गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यानंतर गुन्हा



दाखल करण्यासाठी नातेवाईकांनी ठाण्यात ठिय्या मांडला होता. तसेच नातेवाईकांनी पाथर्डी येथे शवविच्छेदन करण्यास नकार दिल्यामुळे आता छत्रपती संभाजीनगर येथे शवविच्छेदन करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली. त्यामुळे घटनेनंतर दुसर्या दिवशीही शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नव्हती. या घटनेमुळे वसतिगृहात राहणार्या विद्यार्थ्यांची सुरक्षितता, शिक्षकांकडून विद्यार्थ्यांशी होणारे वर्तन आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारी गांभीर्याने घेतल्या जातात का? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणाचा सखोल तपास करुन सत्य समोर आणावे आणि दोषी आढळणार्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

मुंबई-बीड मार्गावरील खासगी ट्रॅव्हल्सच्या अवाजवी भाडेवाढीची परिवहन मंत्र्यांकडे तक्रार

विपुल बाळासाहेब पिंगळे यांच्या तक्रारीची दखल; परिवहन आयुक्तांना तत्काळ कार्यवाहीच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

दिवाळीच्या सणासुदीच्या काळात मुंबईबीड मार्गावर धावणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्सकडून प्रवाशांची अवाजवी भाडेवाढ करून आर्थिक लूट केली जात असल्याच्या तक्रारीवरून युवासेनेचे कार्यकारिणी सदस्य, महाराष्ट्र राज्य तथा मराठवाडा विभागीय निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे यांनी आज महाराष्ट्राचे परिवहन मंत्री मा. श्री. प्रतापजी सरनाईक साहेब यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे तक्रार केली.

या तक्रारीची गंभीर दखल घेत मंत्री प्रतापजी सरनाईक यांनी परिवहन आयुक्तांना तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. दिवाळीनिमित्त मुंबईहून बीडकडे येणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली असून, याच काळात काही खासगी ट्रॅव्हल्स चालकांकडून नियमित भाड्यापेक्षा कित्येक पटीने अधिक भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. ५०० ते ९०० रुपयांच्या आसपास असलेल्या तिकिटांसाठी हजारो रुपये आकारले जात असल्याने सर्वसामान्य प्रवाशांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर विपुल पिंगळे यांनी खासगी ट्रॅव्हल्सच्या मनमानी भाडेवाढीवर नियंत्रण आणण्याची आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ट्रॅव्हल्स चालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच वाहनांची फिटनेस प्रमाणपत्रे, विमा, चालकांचे परवाने, अधिकृत परमिट, आपत्कालीन दरवाजे आणि अग्निसुरक्षा उपकरणांची तपासणी करण्याची मागणीही त्यांनी केली. परिवहन विभाग आणि बीड प्रादेशिक परिवहन कार्यालयाने विशेष तपासणी मोहीम राबवून प्रवाशांची होणारी आर्थिक लूट थांबवावी, तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, ◂◂ पान ३ वर



दि जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, जालना

मुख्य कार्यालय, संतोषी माता रोड, जालना स्वामी विवेकानंद हॉस्पीटल समोर

फोन क्र.०२४८२-२३१७८१,२३४१९५

'छपाई निवीदा'

जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. जालना बँकेस स्टेशनरी छपाई करुन घ्यावयाची असल्याने ईच्छुक प्रेसधारकांनी आपल्या छपाई दराची निविदा पोटी अनामत रक्कम रु.१००००/-(दहा हजार रुपये मात्र) बँकेच्या संतोषी माता रोड जालना शाखेत दि.२९/१०/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत भरणा करुन भरणा पावती आपले सिलबंद निविदा सोबत जोडावी व आपल्या निविदा बँकेच्या रेकॉर्ड विभागात सादर कराव्यात. छपाई करावयाच्या ॲटमचा तपशिल, नमुना, सुचना अटी व नियम बँकेच्या मुख्य कार्यालयातील रेकॉर्ड विभागात बँकेच्या कामकाजाच्या वेळेत पहावयास मिळतील.

स्वाक्षरीत /-
सरव्यवस्थापक

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26